सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. ०९ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२८ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अयोध्येत श्रीराम तर बिहारमध्ये सीताधाम, अमित शाहंनी केली पायाभरणी

सीतामढी : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी बिहारमधील सीतामढी जिल्ह्यातील देवी सीतेच्या पवित्र जन्मस्थळी पुनौरा धाम मंदिराची पायाभरणी केली. नव्या मंदिराला माँ जानकी मंदिर असे नाव दिले जाणार आहे. शुक्रवार ८ ऑगस्ट रोजी दुपारी मंदिरासाठी पायाभरणीचा विधी झाला. मुख्यमंत्री नितीश कुमार याप्रसंगी उपस्थित होते. सीतेचे मंदिर २०२८ मध्ये पूर्ण होईल.

पुनौरा धाम येथे झालेल्या कार्यक्रमात अमित शाह यांनी मंत्रोच्चारात माँ जानकी मंदिराची पायाभरणी केली. नितीश कुमार यांच्याव्यतिरिक्त उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी याप्रसंगी उपस्थित होते. अमित शाह यांनी शंखनादानंतर आरती पण केली. अयोध्या-काशी, मिथिला येथून आलेल्या पुजाऱ्यांनी मंत्रोच्चार केले. अमित शाह यांनी पूजा केली.

बिहारमध्ये काही महिन्यांनी विधानसभेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीआधी सीतेच्या मंदिरासाठी पायाभरणी झाली. याआधी २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीआधी अयोध्येत राम मंदिराचे उद्घाटन झाले होते. पंतप्रधान मोदींनी उद्घाटन केले होते. याप्रसंगी हजारो मान्यवर आणि सेलिब्रेटी उपस्थित होते.



सीतेच्या मंदिरामुळे वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल. विरोधक सनातन संस्कृतीपासून दुरावले आहेत. पण आम्ही आजही सनातन संस्कृतीनुसार वागत आहोत. ऋषी-संत, देवतांबद्दल आमच्या मनातील भावना सर्वांना माहिती आहे. शिवाय सीतेच्या मंदिरामुळे बिहारमधील पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होणार असल्याचे बिहार भाजपच्या नेत्यांनी सांगितले.

मा जानकीचे जन्मस्थान असलेले पुनौरा धाम हे सीतामढी जिल्ह्यातील पुनौरा गावात आहे. दरवर्षी धार्मिक प्रसंगी येथे मोठ्या संख्येने भाविक पूजा करण्यासाठी येतात. यावर्षी, राज्य सरकारने अयोध्येतील श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाच्या धर्तीवर पुनौरा धाममधील श्री जानकी जन्मभूमी, पुनौरा धाम मंदिर संकुलाचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेला आकार देण्यासाठी, मंदिर संकुलाच्या आसपास ५० एकर जमीन संपादित केली जात आहे. या प्रसंगी, अमित शाह सीतामढी ते दिल्ली या अमृत भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील, ज्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पवित्र ठिकाणी येणाऱ्या भाविकांना चांगली कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी मंजुरी दिली होती.

श्री जानकी जन्मभूमी, पुनौरा धाम मंदिराचे सुरळीत आणि प्रभावी कामकाज आणि व्यवस्थापन करण्यासाठी, बिहारच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक विश्वस्त समिती देखील स्थापन करण्यात आली आहे. अधिग्रहित जमिनीवर आणि धार्मिक विश्वस्त मंडळाच्या नियंत्रणाखाली असलेल्या जमिनीवर राज्य सरकारने एकूण ८८२,८७,००,००० रुपयांची योजना मंजूर केली आहे. ही योजना पर्यटन विभागामार्फत राबविली जात आहे. या प्रकल्पांतर्गत, भूसंपादन, मंदिर विकास, सीताकुंडचा विकास आणि पर्यटनाशी संबंधित पायाभूत सुविधांचा विकास केला जाईल.

# मोदी सरकारचे मोठे निर्णय : ५२,६६७ कोटी रुपयांच्या पॅकेजला मंजुरी

नवी दिल्ली: अमेरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लागू केल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत एकूण ५२,६६७ कोटी रुपयांच्या पॅकेजला मंजुरी देण्यात आली आहे. या पॅकेजमध्ये एलपीजी, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि ईशान्येकडील राज्यांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत.

उज्ज्वला आणि तेल कंपन्यांना दिलासा

या बैठकीत सरकारने पंतप्रधान उज्ज्वला योजना अधिक बळकट करण्यासाठी १२,०६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याशिवाय, सार्वजनिक क्षेत्रातील तीन मोठ्या तेल कंपन्यांना म्हणजेच इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियमला ३०,००० कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.



आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये आंतरराष्ट्रीय बाजारात एलपीजीच्या किमती वाढलेल्या असतानाही, ग्राहकांवर दरवाढीचा बोजा पडू नये यासाठी सरकारने दर स्थिर ठेवले होते. यामुळे या कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागला. या तोट्याची भरपाई करण्यासाठी हे अनुदान १२ टप्प्यांमध्ये दिले जाईल. यामुळे कंपन्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

शिक्षण आणि पायाभूत सुविधांवर भर

शिक्षण क्षेत्रातही सरकारने मोठी घोषणा केली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी ४,२०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त, ईशान्य भारतातील राज्यांच्या विकासासाठी ४,२५० कोटी रुपयांचे विशेष अनुदान पॅकेज मंजूर करण्यात आले आहे. तसेच, दक्षिण भारतात पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी मरक्कनम-पुदुच्चेरी या चार पदरी महामार्गासाठी २,१५७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे विविध क्षेत्रांमध्ये विकासाला गती मिळण्याची अपेक्षा असून, सर्वसामान्यांनाही याचा थेट फायदा होणार आहे.

# नारळी पौर्णिमेच्या परीक्रमा वेढा निमित्ताने दत्त गडावर भक्तांची मांदियाळी; सुमारे चार लाख भाविक दाखल

तभा वृत्तसेवा

माहूर, दि.०८ ऑगस्ट

: श्री दत्तात्रेय मंदिर दत्त शिखर संस्थान माहूरगड येथे नारळी पौर्णिमा परीक्रमा,पंचक्रोशी यात्रा महोत्सवातील प्रमुख पारंपारिक धार्मिक आकर्षण असलेला परीक्रमा वेढा आज ८ ऑगस्ट २०२५ (शुक्रवार) रोजी दुपारी ४ वाजता दत्तशिखर मंदिरातून

विधीवत धार्मिक पूजाविधीनंतर पंचक्रोशी क्षेत्रात मार्गस्थ झाला.

यावेळी जवळपास साडेतीन ते चार लाख भाविक दत्त गडावर दाखल झाले असण्याचा प्रशासकीय अंदाज वर्तविण्यात आला असून, जणू भाविकांचा जनसागर दत्त गडावर उसळ्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत होते.

सर्वप्रथम श्री दत्त महाराजांची पूजन-विधीपूर्वक आरती करण्यात आली. सर्व तीर्थस्थानांहून पवित्र तीर्थ आणून दत्त महाराजांचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर परमपूज्य श्री श्री १००८



महंत मधुसूदन भारती महाराज यांच्या आशीर्वादाने परीक्रमा वेढा यात्रेचा शुभारंभ झाला.

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या माहूरगडावर सध्या भक्तिभाव, उत्साह आणि अध्यात्माचा संगम पाहायला मिळत आहे. श्री दत्तात्रेय संस्थान, दत्तशिखर, माहूरगड येथे परमपूज्य श्री श्री १००८ महंत मधुसूदन भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड दत्त नाम सप्ताह आणि पंचकोशी परिक्रमा यात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

आज निघणाऱ्या परिक्रमा वेढ्यात सहभागी होण्यासाठी संस्थानच्यावतीने भाविकांना दुपारी ३ वाजेपर्यंत दत्तशिखर येथे हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले होते, ज्यास मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाला.

सुमारे चार लाख भाविकांची उपस्थिती - पोलिस प्रशासनाचा अंदाज

या यात्रेदरम्यान माहूरगडावर लाखो भाविकांची उपस्थिती होती. माहूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक गणेश कराड यांनी पोलिस प्रशासनाच्यावतीने वर्तविलेल्या अंदाजानुसार सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत दत्त गडावर सुमारे साडेतीन ते चार लाख भाविकांची उपस्थिती असल्याचे सांगितले आहे.आज परिसरात 'दत्त जयजयकार' आणि 'जय अनुसया माते'च्या घोषणांनी वातावरण दुमदुमले होते. भक्तांनी विविध वेशभूषा, पताका आणि पालख्या घेऊन यात्रेत सहभाग घेतला. सह्याद्री पर्वत भक्तांनी गजबुजून गेला होता.

प्रशासनाचा कडक बंदोबस्त

लाखोंच्या गर्दीचा विचार करून प्रशासनाच्या वतीने कडक सुरक्षा बंदोबस्त ठेवण्यात आला. वाहतूक व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची व्यवस्था उत्तमप्रकारे पार पाडली गेली.

मान्यवरांची उपस्थिती

दत्तशिखर येथील मुख्य पुजारी वासुदेव भारती महाराज, चिंतामन भारती महाराज, ऋषिकेश जोशी, रवी जोशी तसेच दत्तशिखरवरील साधू-संत, संस्थानातील कर्मचारी व स्वयंसेवक यांनी यात्रेच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावत असताना दिसून आले.

या सोहळ्यामुळे माहूरगड परिसरात भक्ती, श्रद्धा आणि आनंदाचा दरवळ सर्वत्र पसरला असल्याची धार्मिक अनुभूती अनुभवायला मिळत आहे.

# पैठणी विनाकरांसोबत रक्षा बंधन साजरा

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०८: देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधनाचं कार्यक्रम पैठणी साडी सेंटर येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमास पैठणी केंद्राचे व्यवस्थापक संजय कोठुकर आणि सहव्यवस्थापक जितु विश्वास परदेशी आणि हातमाग विणकर लाडक्या बहिणीचा उत्सापूर्वक सहभाग होता. या कार्यक्रमाचे आयोजन नगराध्यक्ष सूरज लोळगे व भारतीय जनता पार्टी चे मंडळ अध्यक्ष ब आंधळे यांनी केले होते.



यावेळी अध्यक्ष लक्ष्मण औटे, शहर अध्यक्ष सिद्धार्थ परदेशी, सरचिटणीस सुरेश गायकवाड, सतीश आहेर, अश्विनीताई लखमले, मोनिका ताई डांगरे, विशाल पोहेकर,कैलास बरकसे, समीर शुक्ल, आबासाहेब गिरगे,ज्ञानेश्वर दहिवाळ, सुनील वीर, गणेश डुकरे, सुनील विर,विजय आचार्य, सोशल मीडिया शहराध्यक्ष निखिल गुप्ता, जगदीश वीर, अनिल पवार,विष्णू सोनार, भगवान गालफडे, विशाल पैलवान, वैभव पोहेकर, लक्ष्मीकांत पसारे, सखाराम वाघमारे, योगेश धर्माधिकारी आदी उपस्थित होते.



# मा. आ. गोरंटयाल यांच्या एका निर्णयाने आ. खोतकर, आंबेकर, यांचा महापौर पदाचा मार्ग सुकर !!

## भास्करराव दानवे हेच भाजपकडुण महापौर पदाचे खरे हक्कदार?







तभा वृत्तसेवा
जालना / सुरेश कवडे

राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर अनेक राजकीय नेते सत्तेत असलेल्या राजकीय पक्षात पुढील ध्येय धोरणात्मक बदल घडवून आणण्यासाठी आगामी जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था, नगर परिषद, महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता सत्तेत असलेल्या राजकीय पक्षात सहभागी होत सक्रीय सदस्यत्व घेण्यासाठी पक्षप्रवेश करीत आहेत. अश्यातच जालण्याचे माजी आमदार कैलाश गोरंटयाल यांनी भाजपचे प्रदेश अध्यक्ष यांच्या उपस्थितीत भाजप पक्षात जाहीर प्रवेश केला. खरं पाहता माजी आमदार कैलाश गोरंटयाल यांचा विधानसभा निवडणुकांत पराभव झाला असला तरी त्यांना मानणारा जालना शहरात चाहत्यांचा मोठा वर्ग होता. माजी आमदार गोरंटयाल यांच्या भाजप प्रवेशाने जालना जिल्ह्यातील सर्वच दिग्गज नेते मंडळीची झोप काही वेळापुरती उडाली होती. मात्र माजी आमदार गोरंट्याल यांनी कमळ हाती घेतल्याने शिवसेनेचे (उबाठा गट) नेते आंबेकर यांचा मार्ग मोकळा केला आहे. असे जालना शहर रहीवासियांतुन एकाकी बोलाचे सुर शहरातील चौकाचौकात ऐकायला मिळत आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी विधानसभा निवडणुकांनंतर जालना शहरात विविध योजनेच्या माध्यमातून विकासकामे केली आहेत. तर जालना महानगरपालिका निवडणुक रिंगणात जालना शहराध्यक्ष विष्णु पाचफुले फिक्स महापौर म्हणून आ. अर्जुनराव खोतकर यांनी अनेकवेळा सर्वासमोर घोषीत केले आहेत. तसेच जालना शहरात आमदार खोतकर पिता पुत्रांच्या चाहत्यांची गर्दी वाढतच आहे शिवाय शहराध्यक्ष विष्णु पाचफुले, भाऊसाहेब घुगे, पंडीतराव भुतेकर पुत्र अभिमन्युव खोतकर यांचा जालना शहरात वाढता प्रभाव पाहता तसेच शहरातील युवकांचे मोठे जाळे शहरात निर्माण केले आहे. यामुळे आमदार खोतकर यांनाही यावेळी जालना महानगरात महापौर पदाच्या निवडणुकीत हमखाश यश मिळु शकते असेही राजकीय विश्लेषक जाणकर वर्गातुन बोलले जात आहे.

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे चुलत बंधु भास्करराव दानवे सध्याचे भाजप पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांच्या बाबतीत सांगायचे म्हणजे माजी मंत्री दानवे यांच्या खांद्याला खांदा लावून दादा सोबत जालना जिल्हयात भाजपच्या प्रत्येक कार्यात न चुकता हजेरी लावून जबाबदारीने पक्षाचे काम करत आहेत. दादां बरोबर भास्करराव दानवे यांचाही चाहत्यांचा जालना शहरात मोठा वर्ग आहे. त्यांनीही जालना महानगरपालिकेच्या महापौर पदाची ईच्छा अनेकवेळा व्यक्त केली होती. तसेच शहर जिल्हाध्यक्ष पदाची धुरा सांभाळत त्यांनी जालना महानगरात आपला जम चांगलाच बसवला आहे. आणि भाजप साठी योग्य उमेदवार असतील असे जालना शहरवासीयांतुन बोलले जात आहे.

“ जालना शहरात कॉंग्रेस पक्षाला माजी मा. आमदार कैलाश गोरंटयाल यांनी जरी सोडचिठ्ठी देऊन ईतर पक्षात प्रवेश घेतला असला तरीही जालना शहरात कॉंग्रेस पक्षाच्या विचारधारेचे मतदार हे बहुसंख्येत आहेत. कॉंग्रेस पक्षाचे सध्याचे प्रदेश उपाध्यक्ष खा. कल्याण काळे यांनाही जालना महानगरातुन मतदारांनी बहुसंख्येने आपली मते दिली होती. याचाही विचार कॉंग्रेस पक्षाच्या संबंधीत वरिष्ठ पदाधिकारी तथा कॉंग्रेस पक्षाचे पक्ष निरिक्षकांनी विचारात घ्यावे. जालना महानगरपालिका निवडणुकांमध्ये कॉंग्रेस पक्षाने योग्य उमेदवार दिल्यास कॉंग्रेस पक्षाच्या पारड्यात नक्कीच जालना महापालिकेचा नवा महापौर पक्षाच्या पारड्यात दिसेल यात दुमत नाही.

## संक्षिप्त

### मी कुठल्याही पक्षात जाणार नाही– मा. आरोग्य मंत्री राजेश टोपे



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड सोशल मीडियावर माजी मंत्री राजेशभैय्या टोपे साहेब भाजपा पक्षात प्रवेश करणार असल्याच्या बातम्या फिरत आहेत यावर माजी मंत्री राजेशभैय्या टोपे साहेब म्हणाले की,''मी इतर कुठल्याही पक्षात जाणार नाही, पक्ष प्रवेशासाठी मी कुणालाही भेटलेलो देखील नाही. त्यामुळे माझ्या भाजपा पक्ष प्रवेशाच्या येणाऱ्या बातम्या या निव्वळ अफवा आणि खोट्या आहेत. मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, शरदचंद्रजी पवार पक्ष कधीही सोडणार नाही.'' असा खुलासा केलेला आहे.

यावेळी बोलतांना राजेशभैय्या टोपे म्हणाले की,गेली अनेक वर्ष पक्षाशी एकनिष्ठ राहून काम करत आहे आणि काम करत राहणार असल्याचे सांगितले.

### मंठेकरांचे प्रेम कदापिही विसरणार नाही – रवींद्र निकाळजे



तभा वृत्तसेवा
मंठा प्रतिनिधी

मंठा येथे पोलिस निरीक्षक पदाच्या कार्यकाळात सर्व स्तरातील नागरिक, पत्रकार व पोलीस कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. त्यामुळे मंठेकरांचे प्रेम कदापिही विसरणे शक्य नाही असे भावनिक उद्गार पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांनी व्यक्त केले. जालना येथे गृह विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल शहरातील नागरीक, पत्रकार व पोलीस कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री निकाळजे बोलत होते. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे, विठ्ठल केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री निकाळजे म्हणाले की, मंठा हे शांतता प्रिय शहर आहे, येथील नागरिकांमध्ये सहकार्याची भावना असून सर्वांच्या सहकार्यामुळेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यात मदत झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नूतन उपविभागीय पोलीस अधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल श्री. निकाळजे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे, विठ्ठल केंद्रे, मुस्तफा पठाण, संतोष दायमा यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, अरुण वाघमारे, बाज खान पठाण, जे. के. कुरेशी, प्रकाश घुले, शबाब कुरेशी यांच्यासह पत्रकार, पोलीस पाटील, पोलीस कर्मचारी व शहरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आगामी काळात होणाऱ्या निवडणुकांसाठी सज्ज राहावे – रावसाहेब दानवे



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

आज भारतीय जनता पार्टी कार्यालयात माजी आ. कैलासजी गोरंट्याल यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला. या निमित्ताने नवप्रवेशित कार्यकर्त्यांसह समन्वयक बैठक व हर घर तिरंगा यात्रेच्या नियोजन बैठकीचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

भाजपा कार्यालयात माजी आ. कैलासजी गोरंट्याल यांचे प्रथम आगमन झाल्याने त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन भव्य स्वागत करण्यात आले. तसेच त्यांच्या प्रवेशामुळे आगामी काळात होणाऱ्या महानगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपाचा विजय अधिक भक्कम होईल, असा विश्वास दादांनी व्यक्त केला.

या बैठकीस माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी आ. कैलासजी गोरंट्याल, जालना महानगर भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, अक्षय भैया गोरंट्याल, भाजपा प्रदेश पदाधिकारी, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, महिला मोर्चा चे पदाधिकारी, भाजपा जिल्हा पदाधिकारी, मंडळ पदाधिकारी, मोर्चाचे पदाधिकारी तसेच असंख्य कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भोकरदन शहरातील म्हाडा कॉलनी मधील असलेले मिरची मार्केट इतरत्र हलवा; नसता उग्र आंदोलन करणार



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनीधी

म्हाडा ते इंगळेवाडी रस्त्यावरील मिरची खरेदी मार्केट इतरत्र ठिकाणी हलवण्याची मागणी येथील या भागातील नागरिकांनी भोकरदन येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना ता. ७ गुरुवार रोजी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे,या निवेदनात म्हटले आहे की इंगळे वाडी या मुख्य रस्त्यावर

दररोज दुपारी २ वाजेपासुन ते संध्याकाळपर्यंत व्यापारी मिरची खरेदी–विक्रीचा व्यवहार सुरू असून व सदरील मिरची मार्केटमुळे आमच्या परिसरामध्ये मिरचीची धुळ होवुन ठसका निर्माण होत आहे व त्यामुळे आमच्या घरातील लहान–लहान मुले, वयोवृध्द नागरीक व येणाऱ्या जाणाऱ्या पादचार्या नागरीकांना मिरचीच्या ठसक्यामुळे मोठा त्रास होत आहे तसेच काही नागरीक तर आजारी पडत आहे त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे , तसेच सदरील ठिकाणी येणारे व्यापारी व नागरीक आमच्या घराच्या भिंतीवर व उघडयावर लघुशंक करीत असून त्यामुळे या परिसरातील महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, होत आहे. तसेच तालुक्यातून शेतकऱ्यांचे मिरची घेवुन येणारे ट्रॅक्टर, टेम्पो, लोडिंग रिक्षा, सदरील वाहनाचे चालक मोठमोठ्याने कर्णकर्कष आवाजाने हॉर्ण वाजवत असल्यामुळे लहान मुलांना देखील भिती भीती निर्माण झाली असून सदरील गाडीचे चालक भरधाव वेगाने आपले वाहने चालवतात त्यामुळे आमच्या परिसरामध्ये असलेले न्यु हायस्कुल, अॅड.एस.डी. देशमुख महाविद्यालय, शिवा प्राथमिक शाळा या शाळा व महाविद्यालय असुन तेथे नेहमीच विद्यार्थीची वर्दळ असते त्यामुळे विद्यार्थ्यांना सुध्दा मोठा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे सदरील ठिकाणी असलेले मिरची मार्केट हे शहरापासुन कुठेतरी दुर इतरत्र हलविण्यात यावे अशी मागणी शेवटी या निवेदनात नमूद केले आहे, न हटवल्यास नसता उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा या भागातील नागरिकांनी दिला आहे, या निवेदनावर म्हाडा कॉलनी, इंगळे वाडी, विठठल रुखमाईनगर, नाकोडा नगर या भागातील नागरिक व महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत,

## पारध शाहूराजे येथील एनडीआरएफ जवान संतोष तेलंग्रे यांना मेजर पदी पदोन्नती



तभा वृत्तसेवा
पारध/प्रतिनीधी

पारध शाहूराजे तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील तरुण श्री संतोष गंगाराम तेलंग्रे हे २००६ यावर्षी सीआरपीएफ मध्ये कॉन्स्टेबल पदावर देशसेवेसाठी भरती होऊन रुजू झालेले आहेत. त्यांनी आतापर्यंत भारतातील आसाम, तामिळनाडू, या राज्याबरोबरच महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड यासारख्या नक्षलग्रस्त राज्यातसुद्धा सलग सोळा वर्षापेक्षा जास्त काळ देशसेवा केलेली आहे. २०२३ मध्ये त्यांची प्रतिनियुक्ती राष्ट्रीय आपदा मोचन बल NDRF मध्ये झाली. त्यांनी या दलात कार्य करत असताना विविध प्रकारची सेवा देऊन उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. सध्या ते मान्सून कालावधीमध्ये महाराष्ट्रातील रायगड या पुरग्रस्त भागात आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य करत आहे.

अशाप्रकारे सातत्यपूर्ण सेवा देत असताना त्यांच्या जवळपास २० वर्षांच्या कर्तव्यनिष्ठ देशसेवेची दखल घेऊन त्यांना हेड कॉन्स्टेबल मेजर पदी पदोन्नती मिळाली आहे. श्री जालिंदर फुंदे, इन्स्पेक्टर, तसेच श्री एस.एन. त्रिपाठी, असिस्टंट सब इन्स्पेक्टर यांच्या हस्ते त्यांना बॅच लावून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी ५ पॅरा बटालियन पुणे NDRF – टीमचे सर्व पदाधिकारी, सहकर्मी, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

सर्वांनी त्यांना पद भूषणाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. शेवटी संतोष तेलंग्रे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

याबद्दल त्यांचे मुळगाव पारध शाहूराजे तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील मित्र परिवाराकडून,सर्व गावकरी मंडळी कडून, नातेवाईकाकडून त्यांचे अभिनंदन व विशेष कौतुक होत आहे.

## शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी चालक – वाहकांना बांधल्या राख्या



तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनीधी

ज्यांच्यामुळे आपण दररोज शाळेत येऊ शकतो अशा एस. टी. महामंडळाच्या चालक आणि वाहकांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करत रक्षाबंधन सणाचे औचित्य साधत शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बसस्थानकावर जाऊन चालक आणि वाहकांना राख्या बांधल्या.दरम्यान, शाळेचे मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधन सणाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी (दि. ८) विद्यार्थिनींनी हा उपक्रम राबवला.

येथील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शहरासह ग्रामीण भागातील मुले–मुली मोठ्या संख्येने शिक्षण घेण्यासाठी येतात. खास मुलींसाठी एस. टी. महामंडळाच्या वतीने मानव विकास योजनेअंतर्गत विविध गावांसाठी बसेस सोडण्यात येतात. बसचा लाभ घेत ग्रामीण भागातील मुली परतूर शहरात शिक्षणासाठी येतात. परतूर आगारातील चालक, वाहकांमुळे आपणाला दररोज शाळेत येणे शक्य होते तसेच शाळा सुटल्यानंतर वेळेत घरी पोहोचता येते अशी भावना व्यक्त करत विद्यार्थिनींनी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून चालक, वाहकांना राख्या बांधल्या. दरम्यान, विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे शहरात कौतुक होत आहे. यावेळी पर्यवेक्षक राजकुमार राऊत सांस्कृतिक विभाग प्रमुख बालाजी ढोबळे इतरांची उपस्थिती होती.

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेच्या ताब्यात घेण्यासाठी तयारीला लागा – ना. उदयजी सामंत



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

आगामी होऊ घातलेल्या जालना जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचेचा भगवा फडकविण्यासाठी व या संस्था ताब्यात घेण्यासाठी तयारीला असे उद्योग मंत्री मा. ना. उदयजी सामंत यांनी उपस्थिताना मार्गदर्शन करताना सांगितले.

यावेळी शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचेचा भगवा झेंडा फडकविल्या शिवाय आम्ही स्वस्त बसणार नाही. यासाठी आमचे पदाधिकारी कार्यकर्ते शिवसैनिक मोठ्या प्रमाणावर जोमाने कामाला लागले आहेत.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात राज्याचे उद्योग मंत्री माननीय नामदार उदयजी सामंत साहेब व शिवसेना उपनेते आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हॉटेल अजंता अंबेसेडर छत्रपती संभाजीनगर येथे जालना जिल्ह्यातील शिवसेना प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते शिवसैनिक यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये मंत्री सामंत यांनी विधानसभा निहाय पदाधिकारी यांच्या कडुन पक्षाच्या कार्याचाआढावा घेतला. याप्रसंगी मा.खा. राहुलजी शेवाळे, शिवसेना सचिव संजय मोरे, युवासेना सचीव अभिमन्यू दादा खोतकर, मराठवाडा संपर्क प्रमुख पटवर्धन, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, सह संपर्क प्रमुख फिरोजलाला तांबोळी, सुनिल किनगावकर जिल्हा प्रमुख ए.जे. बोराडे, भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, संतोष मोहिते, वसंतराजे जाधव, महिला आघाडीच्या संपर्क नेत्या सविता केवंडे, जिल्हा प्रमख कालिंदाताई ढगे–पाटील, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, युवासेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकुर अजय कदम, उपजिल्हाप्रमुख गणेश मोहिते, यांच्यासह आजी माजी जि.प. प.स. सदस्य, नगरसेवक राहुल हिवराळे, मेहराज चौधरी विभागप्रमुख, ता. प्रमुख भगवानराव अंभोरे, युवासेना ता. प्रमुख राहुल गवारे, युवासेना शहर प्रमुख योगेश रत्नपारखे उपविभाग प्रमुख, सर्व सलग्ण संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनचे अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी ॲड. शेख हाफिज एन. जहागीरदार



अहिल्यानगर : महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशन चे अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी नोटरी पब्लीक ॲड. शेख हाफिज एन. जहागीरदार यांची नुक्तीच महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. सय्यद सिकंदर अली, कार्याध्यक्ष ॲड. यशवंतराव खराडे, ॲड. प्रविण एच नलावडे यांनी निवड केली असून तसे पत्र दिले आहे. भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांचे विधी व न्याय विभागा मार्फत नोटरी कायदा १९५६ मधील कलम ४ (१) प्रमाणे वकिलांमधून नोटरी यांची नियुक्ती केलेली आहे. महाराष्ट्रात अनेक नोटरी कार्यरत असुन वेगवेळ्या शासकीय कार्यालयात लागणारे प्रतिज्ञानापत्रे, करारनामे, अधिकारपत्र, मृत्युपत्र भाषांतर, सांक्षकण तसेच न्यायालयात दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्रे करण्याचे काम नोटरी करतात सदर कामे करताना नोटरी यांना त्यांचा परवाना नुतनिकरण, शासकिय स्थरावर व पोलिसा दाखल होणारे गुन्हे व इतर अडचणीचे निवारण करणे करीता महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनची सुमारे २२ वर्षापुर्वी स्थापना झालेली आहे व सदर संस्था ही नोटरींचे न्याय हक्का करीता संघर्ष करीत आहे व त्या करीता वेळोवेळी नोटरीं करीता मार्गदर्शन शिबिरे, मेळावे, चर्चासत्राचे आयोजन करीत आहे. दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी रामकृष्ण मोरे सभागृह पिंपरी चिंचवड, पुणे येथे महाराष्ट्रातील नोटरींची ५ व्या वार्षिक परिषदेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सदर परिषदमध्ये सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती तसेच केंद्रीय कायदा मंत्री व विधि विभातील अनेक मान्यवर मार्गदर्शन करणार आहे तसेच महाराष्ट्र उत्कृष्ट विधी तज्ञ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

## सुनिलकुमार बर्वे यांची सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता या पदावर पदोन्नती



गंगापूर दि.८: जिल्हा व सत्र न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असलेले अतिरिक्त सरकारी अभियोक्ता एस एस बर्वे यांची सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता या पदावर पदोन्नती. एस एस बर्वे हे २०२१ पासून अतिरिक्त सरकारी अभियोक्ता (जिल्हा सरकारी वकील) म्हणून छ. संभाजीनगर येथे कार्यरत होते त्यांच्या ह्या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## रॉयल स्टॅग बूमबॉक्स सादर करत आहे 'मेबी' हे बूमबॉक्स ओरिजिनल गाणं

छत्रपती संभाजीनगर : रॉयल स्टॅग बूमबॉक्स हे युनिव्हर्सल म्युझिक ग्रुपच्या सहकार्याने साकारलेलं ब्रँडचं प्रमुख म्युझिक आयपी, आता रॉयल स्टॅग बूमबॉक्स ओरिजिनल्सअंतर्गत नव्या गाण्यांच्या मालिकेसह परतलं आहे, हा एक अनोखा फॉमट आहे, जो मेलडी आणि हिप-हॉपचा संगम घडवतो. पहले जैसी बात नहीं', 'हूडी', 'मोहब्बत' आणि 'इम्तिहान' यांसारख्या यशस्वी ट्रॅक्सनंतर, या हंगामातील तिसरं ओरिजिनल गाणं 'मेबी' सादर करण्यात आलं आहे, ज्यामध्ये अरमान मलिक आणि इक्का यांची दमदार जोडी एकत्र येत आहे.

## अत्याधुनिक स्मार्ट आणि हरित उत्पादन सोल्यूशन्सचे प्रदर्शन

मुंबई - तैवान एक्सलन्स ऑटोमेशन एक्स्पो २०२५ (११-१४ ऑगस्ट, बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई)मध्ये २२ पुरस्कार विजेते ब्रँड्स आणि ४४ अग्रणी औद्योगिक सोल्यूशन्सना प्रदर्शित करेल, जे भारताच्या हरित आणि डिजिटल उत्पादन क्रांतीमध्ये तैवानच्या धोरणात्मक भूमिकेला दृढता देईल. 'ग्रीन व्हिजन, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग' (हरित दृष्टिकोन, स्मार्ट उत्पादन) या संकल्पनेअंतर्गत होणाऱ्या या प्रदर्शनात एआय-संचालित ऑटोमेशन, शाश्वत धातूकाम तंत्रज्ञान आणि इंडस्ट्री ४.०-सुसज्ज रोबोटिक्सचा समावेश आहे, ज्याचा भारतातील उद्योगांमध्ये उत्पादकता, ऊर्जा कार्यक्षमता व ईएसजी कामगिरी वाढवण्याचा मनसुबा आहे.

## १३ वर्षीय मुलीवर यशस्वीरित्या जीवनदायी हृदय प्रत्यारोपण करण्यात आले

संभाजीनगर, जालना, : मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमधील बालरोगतज्ज्ञांच्या पथकाने १८ जुलै रोजी महाराष्ट्रातील जालना येथील खानसा रहीम सय्यद या १३ वर्षीय मुलीवर यशस्वीरित्या हृदय प्रत्यारोपण केले, ज्यामुळे तिला नवीन जीवनदान मिळाले. ब्रेन डेड घोषित करण्यात आलेल्या २५ वर्षीय रुग्णाच्या कुटुंबाने पुढाकार घेऊन त्याचे अवयव दान करण्यास संमती दिली, ज्यानंतर हे प्रत्यारोपण शक्य झाले, जे महाराष्ट्रामधील या वर्षातील ८५वे अवयवदान आहे. जानेवारी २०२५ मध्ये फोर्टिस हॉस्पिटल मुलुंड येथे कुमारी खानसाचे डायलेटेड कार्डिओमायोपॅथीसह निदान झाले. ही गंभीर स्थिती आहे, ज्यामुळे हृदय हळूहळू कमकुवत आणि मोठे होते, परिणामत: रक्त कार्यक्षमतेने पंप करण्याची हृदयाची क्षमता कमी होते. अनेक महिन्यांपासून तिला सतत थकवा, श्वास घेताना त्रास होणे, भूक न लागणे आणि वारंवार रुग्णालयात दाखल होणे यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागत होता.

## 'एक होता राजा अकुल त्रिपाठींसह' ७ ऑगस्ट पासून

पुणे : वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी भारतातील एक नवीन मूळ डॉक्युसीरीज़ 'एक होता राजा - अकुल त्रिपाठींसोबत' सादर करण्यासाठी सज्ज आहे। ही मालिका ७ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ९ वाजता डिस्कवरी चॅनेल आणि डिस्कवरी प्लस वर विशेषतः प्रीमियर होणार आहे। गंभीर ऐतिहासिक घटनांची समृद्ध मांडणी आणि प्रभावी कथाकथन यांचा संगम असलेल्या या मालिकेत भारताच्या सुप्रसिद्ध तसेच अल्पपरिचित राजे-राण्यांच्या शौर्य आणि संघर्षमय जीवनाचा आढावा घेतला आहे। यामध्ये अप्रतिम गनिमी काव्याचे तज्ज्ञ, सागरी योद्धे आणि साम्राज्य उभारणारे शासक यांच्या कथा समाविष्ट आहेत। ही आठ भागांची मालिका प्रेक्षकांना विविध शतकांमधून आणि भूगोलांमधून प्रवास घडवते। गढवाल (उत्तराखंड), मालवा (पश्चिम मध्य प्रदेश), राजपुताना (राजस्थान), दख्खन (महाराष्ट्र व तेलंगणा), कर्नाटका आणि काश्मीर - या प्रत्येक भागातून अशा राजांचे चित्रण होते ज्यांचे शौर्य इतिहास घडवणारे ठरले। भारतासह दक्षिण आशियाई प्रवासी समाजालाही ही मालिका सहजपणे समजावी यासाठी ती इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड आणि बंगाली, या सात भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे।

## प्राथमिक फार्मास्युटिकल पॅकेजिंगमध्ये नवीन मापदंड

छत्रपती संभाजीनगर : स्पेशल्टी ग्लासमधील जागतिक प्रणेता कंपनी स्कॉटने आज आपल्या जंबुसर, गुजरात येथील अत्याधुनिक वर्तमान उत्पादन क्षमतेत सिरिंज आणि कार्ट्रिज ग्लास ट्यूबिंगची भर घातल्याचे जाहीर केले. हा भारतातील ग्लास प्राथमिक फार्मास्युटिकल पॅकेजिंग क्षेत्रातील लक्षणीय टप्पा आहे. आणि यामधून स्कॉटची 'मेक इन इंडिया' उपक्रमातील वचनबद्धता अधिक मजबूत झाल्याचे दिसते. या धोरणात्मक कृतीमुळे ही कंपनी आशियातील सर्वात मोठी सिरिंज आणि कार्ट्रिज ग्लास ट्यूबिंगचे उत्पादन करणारी कंपनी ठरली आहे. हे अत्याधुनिक उत्पादन म्हणजे स्कॉटच्या प्रसिद्ध जर्मन निपुणतेकडून झालेले थेट तंत्रज्ञान हस्तांतरण आहे. वजन व्यवस्थापन आणि टाइप-२ डायबीटीसच्या रुग्णांमध्ये रक्त शर्करेची पातळी नियंत्रित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या (जीएलपी-१ रिसेप्टर ॲगनिस्ट श्रेणीमधील) सेमाग्लूटाईडसारख्या औषधांची वाढती मागणी यातून पूर्ण करता येईल. तज्ज्ञांच्या मते, केवळ जीएलपी-१ सेगमेन्टमध्ये तब्बल ३३% सीएजीआर दिसण्याची शक्यता आहे. ते आधीपासून भरलेल्या सिरिंज किंवा कार्ट्रिजमधून देखील देता येते. या लॉन्चसह स्कॉट कंपनी भरतात फार्मा क्षेत्रातील सर्व ग्लास प्राथमिक पॅकेजिंग गरजा पूर्ण करण्यास सक्षम झाली आहे, ज्यामध्ये छोट्या बाटल्या आणि ॲम्पूल्ससाठीच्या ग्लास ट्यूबिंगपासून ते नव्याने दाखल झालेल्या सिरिंज आणि कार्ट्रिजचा समावेश आहे.

# फोनवर बोलवून तरुणावर नऊ जणांचा हल्ला!

## लोखंडी गज, रॉड आणि लाकडी काठ्यांनी मारहाण; रुग्णालयात उपचार, गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०७ ऑगस्ट - कन्नड शहरात एका नातेवाईकाच्या वादातून युवकाला फोन करून बोलावून त्याच्यावर नऊ जणांनी एकत्र हल्ला करत बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. ही घटना मंगळवारी (दि. ५ ऑगस्ट) संध्याकाळी साडेसातच्या सुमारास अंधानेर परिसरात घडली.

या प्रकरणी नितीन संजय गायकवाड (वय २६, रा. मक्रणपूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सतीश काळे व त्याच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी नितीन गायकवाड यांना त्यांचे नातेवाईक सतीश रामनाथ काळे याने फोन करून, तुझ्या चुलतीला मारहाण का केली, त्याबद्दल बोलायचं आहे असे सांगून अंधानेर येथे बोलावून घेतले. नितीन यांनी त्यांच्या भावासह रोहन गायकवाड आणि उमेश सोनवणे यांच्यासोबत मोटरसायकलवरून अंधानेर कडे रवाना झाले.

मात्र, पॉवर हाऊस परिसरात पोहचताच आधीपासून दबा धरून बसलेल्या सतीश काळे, करण सोनवणे, अर्जुन सोनवणे, अरुण सोनवणे, गौरव पवार, राहुल मोरे, शंकर मोरे, नाना गोरे व बाळू मोरे यांनी नितीन यांना अडवले. कोणतीही कल्पना न देता सतीश काळे याने ह्याला जिवे मारून टाका! असा घातक आदेश दिला.

त्यानंतर सतीशने लोखंडी गजने त्यांच्या उजव्या तळहातावर, बाळू मोरे याने लोखंडी रॉडने त्यांच्या डोक्यावर, तर इतरांनी लाकडी काठ्यांनी हात, पाठी, पोट व मांडीवर बेदम मारहाण केली. मारहाणीत नितीन गंभीर जखमी झाले. त्यावेळी सोबत असलेले रोहन गायकवाड व उमेश सोनवणे यांनी प्रतिकार केला, तर आवाज ऐकून शक्ती पवार आणि उमेश सूर्यभान सोनवणे धावून आले आणि भांडण सोडवले. जखमी नितीन यांना तत्काळ कन्नड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेनंतर नितीन गायकवाड यांनी कन्नड पोलीस ठाण्यात उपस्थित राहून फिर्याद दाखल केली असून, पोलीसांनी नऊ जणांविरोधात गंभीर दुखापतीसह इतर कलमांअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार चांद मेंडके करीत आहेत.

## शेड्युल्ड दर्जा मिळाल्याबद्दल सहकार भारतीकडून देवगिरी बँकेचा गौरवपूर्ण सत्कार

छत्रपती संभाजीनगर - देवगिरी नागरी सहकारी बँक लि. ला भारतीय रिझर्व्ह बँकेकडून नुकताच शेड्युल्ड बँक हा प्रतिष्ठेचा दर्जा मिळाला आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल सहकार भारतीतर्फे बँकेचा विशेष सत्कार करण्यात आला.



सत्कार सोहळ्यात सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री शरदराव जाधव, सहकार भारती प्रशिक्षण केंद्र अध्यक्ष संजय बिर्ला, महाराष्ट्र प्रदेश सहसंघटन मंत्री विजयराव देशमुख, महाराष्ट्र प्रदेश सचिव सुनील मोतलग, महाराष्ट्र प्रदेश सहकार भारतीचे पूर्णकालीन कार्यकर्ता प्रविण गायकवाड, तसेच बलवंत नागरी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयदीप शाह, संत ज्ञानेश्वर सहकारी पतसंस्थेचे संचालक आबासाहेब देशमुख उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी देवगिरी बँकेच्या प्रगतीचे कौतुक करत हा दर्जा केवळ बँकेचा नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्यातील सहकार चळवळीचाही सन्मान असल्याचे नमूद केले.

शेड्युल्ड बँक दर्जामुळे देवगिरी बँकेला रिझर्व्ह बँकेकडून थेट व्यवहार, शासकीय योजनांची अंमलबजावणी, स्थानिक स्वराज्य संस्थांची खाती, विदेशी चलन ठेवी स्वीकारणे आणि छ-इ-ठऊ योजनांचा लाभ मिळणार आहे. यामुळे बँकेच्या सेवा व विश्वासार्हतेला अधिक बळकटी मिळेल. बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले, हा दर्जा हा आमच्या ग्राहक, भागधारक आणि कर्मचाऱ्यांच्या विश्वास व परिश्रमांचा गौरव आहे. आम्ही पुढेही समाजाच्या सर्व स्तरांसाठी उत्कृष्ट बँकिंग सेवा पुरवत राहू. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे उपस्थित होते.

## राहुल गांधी यांच्या संघर्षमय नेतृत्वाखाली देशातील सामान्य जनतेचा आवाज बुलंद होईल - दीप चव्हाण

अहिल्यानगर : अहिल्यानगर शहर काँग्रेस पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी माजी नगरसेवक दीप चव्हाण यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार संपन्न झाला. यावेळी बोलताना शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी सांगितले की, काँग्रेस पक्ष ही केवळ एक राजकीय संस्था नसून, ती एक विचारसरणी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आतापर्यंत देशाच्या घडणीत काँग्रेसने मोलाची भूमिका बजावली आहे. महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारख्या द्रष्ट्या नेत्यांनी देशाचे भविष्य घडवले आहे. राहुल गांधी यांच्या संघर्षमय नेतृत्वाखाली देशातील सामान्य जनतेचे आवाज बुलंद केला जात आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा देशाचे प्रभावी नेतृत्व करेल आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी लढा उभारेल, असेही चव्हाण यांनी ठामपणे सांगितले. शहराच्या विकासासंदर्भात बोलताना ते म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिकेत गेल्या काही वर्षांपासून प्रशासनाचा मनमानी कारभार सुरू असून, विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. या भ्रष्टाचारावर वाचा फोडण्यासाठी आणि पारदर्शक कारभार निर्माण करण्यासाठी काँग्रेस पक्ष संघर्ष करेल. नागरिकांच्या प्रश्नांची दखल घेऊन त्या सोडवण्यासाठी आंदोलनात्मक भूमिका घेण्यात येईल.



# बुलडाणा अर्बनच्या 'सुवर्ण कन्या' योजनेला प्रतिसाद; ३०० सोन्याच्या नाण्यांच्या विक्रीचा टप्पा पार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ ऑगस्ट

आपल्या ग्राहकांसाठी आणि सभासदांसाठी नेहमीच नवनवीन आणि फायदेशीर योजना राबविण्यात अग्रेसर असलेल्या बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटीच्या 'सुवर्ण कन्या' योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. संस्थेचे संस्थापक,अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या प्रेरणेने, नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर यांच्या नेतृत्वात आणि सिल्लोड विभागाचे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली,बुलडाणा अर्बनच्या सिल्लोड विभागाने या योजनेअंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.या योजनेला मिळत असलेल्या उदंड प्रतिसादाचेच द्योतक म्हणून,सिल्लोड विभागाने आज ३०० सोन्याच्या नाण्यांच्या विक्रीचा महत्त्वाचा टप्पा पार



करत २ कोटी सुवर्णकन्या सोनेतारण कर्जवाटप करून एक उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.समाजामध्ये लग्नकार्यात किंवा इतर मंगलप्रसंगी सोन्याला विशेष महत्त्व आहे.अनेकदा लग्नाच्या एकूण खर्चापैकी मोठा वाटा सोन्याच्या खरेदीवर होतो. हीच गरज ओळखून,सभासदांना सोन्यामधील गुंतवणूक सोपी व्हावी आणि ऐनवेळी येणारा आर्थिक भार कमी व्हावा,या उद्देशाने बुलडाणा अर्बनने 'सुवर्ण कन्या' योजना सुरू केली आहे.या योजनेअंतर्गत, १००% शुद्ध सोन्याचे नाणे सभासदांना खरेदी करता येते.यासाठी सभासदांना सोन्याच्या दरानुसार केवळ १०% रक्कम आणि त्यावर ३% ऋढढ भरावा लागतो. उर्वरित ९०% रकमेवर संस्थेकडून अत्यल्प व्याजदरात कर्जसुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.यामुळे, ज्यांना टप्प्याटप्प्याने बचत करून सोने खरेदी करायचे आहे, त्यांच्यासाठी ही एक सुवर्णसंधी ठरत आहे.या योजनेविषयी बोलताना सिल्लोड विभागीय व्यवस्थापकांनी सांगितले की,आपल्या घरातील मंगलकार्यासाठी आगाऊ गुंतवणूक करून आर्थिक नियोजन करणे सोपे व्हावे,हा या योजनेमागील मुख्य हेतू आहे.सिल्लोड विभागातील सभासद या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेत असून, त्यांचा प्रतिसाद आमच्यासाठी उत्साहवर्धक आहे.३०० सोन्याच्या नाण्यांच्या विक्रीचा टप्पा यशस्वीरीत्या पार केल्याबद्दल विभागाचे सर्वत्र कौतुक होत आहे.या यशाचे श्रेय संजय दळवी विभागीय व्यवस्थापकांच्या कुशल मार्गदर्शनासह विभागातील शाखेचे सर्व शाखा व्यवस्थापक,कर्मचारी वृंद व शिपाई यांच्या सांघिक प्रयत्नांना जाते अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांनी दिलेल्या माहितीनुसार सिल्लोड विभागातील १७ शाखेवर ५ ग्राम व १० ग्राम चे शुद्ध २४ कॅरेट सोन्याचे नाणे उपलब्ध असून संस्थेच्या जास्तीत जास्त सभासदांनी या कर्ज योजनेचा लाभ घावा.असे आव्हान केले आहे.

## कार्यालय नगर परिषद पैठण

Gmail : munptn@gmail.com | दूरध्वनी क्र... 02431/223010

जा.क्र.नपप १०६०/२०२५ | दि.०६/०८/२०२५

### जाहीर सूचना

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अधिनियम**

**अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत**

सर्व नागरिकांना, सामाजिक, शैक्षणिक व वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यातंर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६७ सेवांची यादी प्रसिद्ध केलेली आहे त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पप्रदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास नगरपरिषद पैठण कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपरिषदे तर्फे पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी पैठण नगरपरिषदेच्या नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
नगरपरिषद पैठण

## नेवासा येथील पोलीस स्टेशनच्या कामाची पालकमंत्र्यांनी केली पाहणी



अहिल्यानगर, दि. ८ - नेवासा येथे उभारण्यात येत असलेल्या पोलीस स्टेशनच्या कामाची राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. पोलीस दलाच्या सक्षमतेवर अधिक भर दिला जात असून, इमारतीचे काम दर्जेदार व गुणवत्तापूर्ण व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. ४ कोटी ४४ लाख रुपये खर्चून उभारण्यात येत असलेल्या या पोलीस स्टेशनच्या इमारतीत तळमजल्यात पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक कक्ष, पोलीस अंमलदार कक्ष, पुरुष व महिला कोठडी, चौकशी कक्ष, सीसीटीव्ही कक्ष, पुरुष व महिला स्वच्छतागृह, पासपोर्ट कार्यालय, हॉल व पँट्री अशी सुविधा असून, पहिल्या मजल्यावर सभाकक्ष, रेकॉर्ड कक्ष, मुद्देमाल कक्ष, पुरुष व महिला विश्रांती कक्ष, निर्भया व हिरकणी कक्ष यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच या इमारतीसाठी सुरक्षा भिंत, अंतर्गत रस्ते, बाग, फर्निचर सुविधा व पार्किंगचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

## महत्त्वाचे कागदपत्र हरवले

गंगापूर (ता. जि. संभाजीनगर) - सविता सुर्यकांत कंठाळे, राहणार गंगापूर, यांनी कळविले आहे की, त्यांची बारावीची टि.सी.दिनांक २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता गंगापूर ते ढोरेगाव दरम्यान ही कागदपत्रे गहाळ झाली.

हरवलेली कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत - बारावीची टी.सी. हरवले आहेत.

कोणालाही ही कागदपत्रे सापडल्यास त्यांनी खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा:

**मो. नं. ८६६८२९७३९८ सुर्यकांत रमेश कंठाळे यांनी सर्व जनतेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.**

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२५/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-१५
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक २४/०७/२०२५

अर्जदार ०:- हिना इस्माईल शेख रा. बोरसर बु. ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय / ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विपयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. ॲड.आर.एम. नरोटे मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या म्यतः चे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा स्वतः हिना इस्माईल शेख चा जन्म दिनांक २०-०४-२००२ रोजी बोरसर बु. ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांच्या स्वतः चा जन्म दिनांक २०-०४-२००२ रोजी बोरसर बु. ता. कन्नड ता. कन्नड येथे ज्ञानेना आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्य/मृत्यू प्रमागपत्राची आवश्यकता आहे.

त्यामुळे नमा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सूचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा स्वतः हिना इस्माईल शेख यांचा जन्म दिनांक २०-०४-२००२ रोजी बोरसर बु. ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाम काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २०-०८-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २०-०४-२००२ रोजी बोरसर बु. ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्रालय धरला जाणार नाही.

करिना दिनांक.......०७/२०२५ रोजी मदर जाहिर प्रगटन माझ्या राहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ५३४/२०२५

अर्जदार १. शिवसिंग पि. सुपडसिंग बैनाडे, वय ७७ वर्ष, २. सुजित पि. शिवसिंग बैनाडे, वय ४९ वर्ष, ३. कपिल पि. शिवसिंग बैनाडे, वय ४३ वर्ष, ४. प्रविण पि. शिवसिंग बैनाडे, वय ४७ वर्ष, सर्व रा. पेंडापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. नवभारत हौ. सोसायटी एन ८ सिडको, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. बी. आर. राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. २ ते ४ हे आपसात सख्ये भाउ असुन अर्जदार क. १ हे त्यांचे वडील आहे. अर्जदार क. १ ची पत्नी व अर्जदार क. २ ते ४ यांची आई नामे लता भ्र. शिवसिंग बैनाडे ही दिनांक २४/०२/२०२३ रोजी मयत झालेली असुन अर्जदार हे मयत लता यांचे एकमेव कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांव्यतीरीक्त मयतास ईतर कुणीही वारस नाही अर्जदारांना शासकिय कामाकरीता ते मयत लता याचे वारस असल्याबाबतचे हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशीप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक ०८/०८/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२५/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-३२
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक ०४/०८/२०२५

अर्जदार ०:- धिरज गुदाम नवले रा. पिशोर ता. कनड जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय / ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या म्वनःचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा स्वतः धिरज सुदाम नवले चा जन्म दिनांक १०-११-२००३ रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः चा जन्म दिनांक १०-११-२००३ रोजी पिशोर ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा स्वतः धिरज सुदाम नवले यांचा जन्म दिनांक १०-११-२००३ रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १०-०९-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १०-११-२००३ रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिना दिनांक ....../०८/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## अग्रलेख...

# 'ट्रम्प' आणि 'पिपाणी'

भारताच्या वाढत्या सामर्थ्याला शह देण्याच्या प्रयत्नांतून भारतावर निर्बंध लादण्याचे किंवा करयुद्ध थोपविण्याचे अमेरिकेचे प्रयत्न नवे नाहीत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जारी केलेल्या भारतविरोधी करनीतीचे म्हणूनच जगाला आश्चर्य वाटलेले नाहीच; उलट ट्रम्प यांच्या अर्थनीतीच्या ज्ञानाचा पंचनामाच सर्वत्र सुरू झाला आहे. खुद्द अमेरिकेतही विदेश नीतीचे जाणकार आणि जागतिक राजनीतीच्या संकेत व सभ्यतेचा आदर करणाऱ्यांमध्ये ट्रम्प यांच्या आततायी भूमिकेवर टीका सुरू झाल्याने ट्रम्प यांचे आयात करअस्त्र अमेरिकेवरच बूमरँग होऊन आदळणार का, याची चर्चा आता सुरू झाली आहे. रशियाकडून केली जाणारी भारताची तेल खरेदी हे ट्रम्प यांचे खरे दुखणे नाही, तर कर्जाच्या बोज्याखाली पिचलेल्या अमेरिकेची अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी महसूल गोळा करण्याच्या हतबल मानसिकतेचे ते लक्षण आहे. अमेरिकेच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीचे उद्योगपती एलन मस्क यांचा अमेरिकेच्या खर्च कपात विभागातील विशेष सरकारी कर्मचारी म्हणून मिळालेला दर्जा संपुष्टात आल्यानंतर ट्रम्प आणि मस्क यांच्यात रंगलेल्या वादाचे पडसाद जगभर उमटले होते. या पदावरून दूर होताच मस्क यांनी ट्रम्प यांच्या अर्थसंकल्पावर टीकेची झोड उठविली होती. अमेरिकेच्या उत्पन्नापैकी २५ टक्के रक्कम केवळ कर्जावरील व्याज चुकविण्यात खर्च होत आहे. ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणाची वाटचाल अशीच सुरू राहिली तर अमेरिकेच्या सरकारी तिजोरीत खडखडाट झालेला असेल. शिक्षण, सामाजिक सुरक्षा, सार्वजनिक आरोग्य किंवा संरक्षणासारख्या अत्यावश्यक बाबींसाठी हाती काही राहणार नाही आणि फक्त व्याजाचे हप्ते चुकविण्यापुरतेच पैसे शिल्लक असतील, असा रोखठोक इशारा मस्क यांनी दिल्यानंतर अमेरिकेच्या आर्थिक हलाखीचे चित्र अधिकाधिक गडद होऊ लागले होते. अमेरिका हे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले राष्ट्र असून कर्जाचा हा बोजा सुमारे ३७ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. या कर्जावरील व्याजापोटी दरवर्षी एक ट्रिलियन डॉलर्स मोजावे लागत आहेत. अमेरिकेसारखा देश दिवाळखोरीच्या कडेलोटावर उभा असल्याने जागतिक अर्थकारणास त्याच्या झळा बसणार आहेत; खुद्द अमेरिकेतही बेरोजगारीसारख्या संकटामुळे जनता भरडून निघेल, अशी भाकिते वर्तविली जात आहेत. कर्जामुळे गुंतवणुकीचा ओघ आटेल आणि आर्थिक विकास मंदावेल; सोबतच अमेरिकेतील नेतृत्वाच्या क्षमतेवरील विश्वासही संपुष्टात येणार असल्याने ट्रम्प यांच्या आततायी निर्णयांमागे प्रतिमाभंजनाचे भय हे महत्त्वाचे कारण असल्याचे उघड होऊ लागले आहे. एकूणच कर्जबाजारीपणाकडे झपाट्याने वाटचाल करणाऱ्या अर्थव्यवस्थेचा सुकाणू ज्याच्या हातात आहे, अशा ट्रम्प यांनी, जागतिक आर्थिक महासत्तांच्या रांगेतील तिसऱ्या क्रमांकाच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करणाऱ्या भारताच्या अर्थव्यवस्थेस मृतावस्थेकडे चाललेली अर्थव्यवस्था म्हणणे आणि केवळ राजकीय विरोधाच्या पीतज्वराने पछाडलेल्या भारतीय विरोधी पक्षांनी ट्रम्प यांच्या सुरात आपल्या पिपाण्यांचे सूर मिसळून देशाच्या बदनामीच्या कटात सहभागी होणे यास विनोदापलीकडे अन्य कोणतेच नाव देता येणार नाही.

मस्क यांच्यासोबतचा वाद विकोपास गेल्यापासून ट्रम्प यांनी सुरू केलेल्या धोरण धडाक्यांची जगभर चर्चा सुरू आहे. भारतावर २५ टक्के आयातभार लावण्याचे व जगातील अनेक देशांवरील करवाढीचे धोरण ट्रम्प यांनी जाहीर केल्यानंतर जागतिक अर्थविश्वात खळबळ माजली असतानाच, भारताला आणखी नवा दणका देण्यासाठीच ट्रम्प यांनी बुधवारी २५ टक्के वाढीव आयात शुल्काची घोषणा केली. त्यामुळे अमेरिकेकडून भारतावर लादल्या गेलेल्या आयात शुल्काचे प्रमाण ५० टक्क्यांवर पोहोचेल व भारताकडून मोठा महसूल उकळता येईल, असा ट्रम्प यांच्या अर्थनीतीचा पाया असावा. यामुळे भारताच्या निर्यातीवर मर्यादा येऊन भारताची अर्थव्यवस्था कोलमडेल, असा त्यांचा होरा असला, तरी भारताकडून अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंमुळे अमेरिकेच्या जनतेस परवडणाऱ्या दरात मिळणाऱ्या वस्तूंच्या किमती भरमसाट वाढतील हा साधा विचार करणेदेखील या आततायीपणापोटी ट्रम्प यांनी टाळले असावे. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याच्या मुद्द्यावरून भारताची कोंडी करण्याच्या या प्रयत्नांस दाद न देता भारताच्या हितासाठी योग्य असलेले धोरणच राबविले जाईल, असा स्पष्ट इशारा देणारा पवित्रा भारताने घेतल्याने आता ट्रम्प नीतीची अखेर कशी होणार हे पाहणे खऱ्या अर्थाने महत्त्वाचे ठरणार आहे. भारत ही जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचा निःसंदिग्ध निर्वाळा जागतिक अर्थविश्वाकडून दिला जात असताना, भारत ही मृत अर्थव्यवस्था असल्याचा हास्यास्पद दावा करणाऱ्या ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळणाऱ्या भारतातील राजकीय नेत्यांच्या हेतूवरही यामुळे प्रश्नचिन्हे उमटणार आहेत. राजकारणात कुरघोडीचा खेळ सतत सुरूच असतो. प्रतिस्पर्धी राजकीय नेत्याच्या किंवा राजकीय पक्षाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्यासाठी वावड्या उठविण्याचा खेळही खेळला जातो. त्यास योग्य त्या यंत्रणेकडून वेळेनुसार चापही लावला जात असतो. भारत ही एक मृत अर्थव्यवस्था आहे, असे वक्तव्य ट्रम्प यांनी केल्यावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही त्याचीच री ओढली होती. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी वास्तवच उघड केले त्याचा मला आनंदच आहे. देशाचे पंतप्रधान व अर्थमंत्री वगळता सर्वांनाच हे माहीत आहे, असे सांगत त्यांनी मोदी सरकारवर नेम धरण्याचे नवे निमित्त साधले, पण काँग्रेसच्याच शशी थरूर, राजीव शुक्ला आदी अन्य काही नेत्यांच्या विवेकीपणापुढे राहुल गांधींचा हा प्रयत्न फिका पडला. पण त्याचेही गांभीर्य लक्षात न घेता, या परस्परांवरील कुरघोडीच्या ईर्ष्येपायी देशाच्या प्रगतीच्या वाटचालीवरील अडथळ्यांच्या प्रयत्नांस हातभार लावून विदेशी शक्तींना बळ देण्याचे राजकारण लज्जास्पद ठरते. विकसित भारताच्या वाटचालीच्या क्षितिजांवरच मळभ उभे करण्याचे कारस्थान सुरू असल्याची शंका येणे साहजिकच आहे. कोणा अन्य देशाच्या प्रमुखाने त्याच्या राजकीय अपरिहार्यतेपोटी व आपल्या क्षमतेचे पितळ उघडे पडू नये याचा आटापिटा करताना भारताच्या आर्थिक आणि विकासाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटवावीत आणि देशातील नेत्यांनी त्यास दुजोरा देत सुटावे, हे लज्जास्पद आहे.

ट्रम्प यांच्या भारतावरील आयात शुल्काच्या निर्णयावर अभ्यास सुरू असून देशाच्या हितापुढे अन्य कोणत्याही दबावाशी तडजोड केली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका भारताने घेतली आहे. देशहित लक्षात घेऊन ट्रम्प यांच्या निर्णयानंतर योग्य तीच पावले उचलली जातील, अशी ग्वाही देऊन केंद्र सरकारने ट्रम्प यांच्या मृत अर्थव्यवस्थेच्या वक्तव्यास सडेतोड प्रत्युत्तरही दिले आहे. आज जगभरातील वित्तसंस्था भारताकडे एक चमकदार क्षेत्र (ब्राईट स्पॉट) म्हणून पाहात असून येत्या काही वर्षांतच भारत ही तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आलेली असेल. तसा विश्वास भारताच्या आर्थिक वाटचालीतील पुढच्या प्रत्येक पावलासोबत उमटतो आहे. जागतिक आर्थिक विकासात भारताचे योगदान अमेरिकेहूनही अधिक असल्याचा दावा करून रिझर्व्ह बँकेनेही ट्रम्प यांच्या वक्तव्याचा संयत व सभ्य शब्दांत समाचार घेतला आहे. ट्रम्प यांच्या नव्या शुल्कवाढीच्या निर्णयानंतर आता जागतिक अर्थनीतीत नवी दिशा मिळण्याची एक नवी प्रक्रिया सुरू होणार व त्या आधारावर आर्थिक सहकार्याचे मजबूत ऐक्य होण्याची नवी प्रक्रिया सुरू होणार याचे संकेत मिळू लागले आहेत. अमेरिकेच्या आर्थिक नीतीच्या परिणामांतून सावरण्याची गरज हा या प्रक्रियेचा अपरिहार्य टप्पा ठरणार आहे. केवळ आर्थिकच नव्हे, तर भू-राजकीय संदर्भही बदलणार असल्याने येत्या काही आठवड्यांत नव्या जागतिक राजनीतीची नवी समीकरणे समोर येतील तेव्हा अमेरिकेच्या अट्टहासाचे परिणाम त्या देशातही दिसू लागलेले असतील. येत्या ऑगस्टअखेरीस भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चीनमध्ये होणाऱ्या शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनचा दौरा करणार आहेत. ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणाच्या झळा चीनलाही बसल्या होत्या. काही काळाने ट्रम्प यांनी चीनच्या आयात शुल्कात कपात केली, पण चीनदेखील रशियाकडून तेल आयात करत असल्याने, अमेरिकेच्या डॉलरची दादागिरी कमी होत असल्याची ट्रम्प यांची खंत आहे. मुळात अमेरिका आणि रशिया यांच्यातील व्यापाराबाबत मात्र स्वतः ट्रम्प अनभिज्ञ आहेत, असे ते स्वतःच सांगतात. भारतानेच ही बाब जगासमोर उघड केल्यावर ट्रम्प यांना बचावाचा पवित्रा घ्यावा लागला, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. असे असेल, तर ट्रम्प यांच्या तुताऱ्यांच्या सुरात आपल्या पिपाण्या फुंकणारे भारतातील विरोधी पक्षांचे नेते वेळ आल्यास स्वतःचा बचाव कसा करतील?

## प्रासंगिक

# यशाची गुरुकिल्ली

**विजय पांढरीपांडे**

आपल्याला कुणाचे बोलणे, वागणे आवडले नाही, पटले नाही की आपण रागाने 'शट-अप' असे म्हणतो. पण कधी आपण स्वतःच स्वतःला शट-अप म्हटले आहे का? प्रश्न विचित्र वाटेल. पण स्वतःला ताळ्यावर आणणे जास्त गरजेचे असते कधी कधी. थोडक्यात काय ते स्वतःला आरशात बघणे. एक प्रसिद्ध शेर आहे... धूळ चेहऱ्यावर होती अन् तो आरसा साफ करीत राहिला! दुसऱ्याचे कुसळ दिसते, पण आपले मुसळ दिसत नाही, अशीही म्हण आहे. प्रोफेशनल भाषेत याला 'सेल्फ करेक्टिंग मेकॅनिझम' म्हणता येईल.

कधी कधी सगळे जग आपल्यासाठी वाईट असते. असे वाटते सगळेच आपल्या विरोधात आहेत. आपले दोष दाखवून आपल्याला त्रास देताहेत. आपल्याला खाली बघायला भाग पाडताहेत. अशा वेळी आपला त्रागा होतो. तोल ढासळतो. मग नकळत आपले वागणे-बोलणे बदलते. अशा वेळी स्वतः स्वतःला शट-अप म्हणण्याची गरज असते. काही गोष्टी तर हळूहळू आपल्या सवयीचा भाग होऊन आपल्या आयुष्याला चिकटतात. अशा वेळी जुनी मंडळी जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही असे टोकाचे विधान करतात. खरेच इतके आपण सवयीचे गुलाम होतो का? होतो... पण निश्चय केला की, बदलणे, स्वतःच्या स्वभावाला मुरड घालणं कठीण नाही. बदल केव्हाही शक्य असतो. त्याला वयाचेदेखील बंधन नाही. फक्त इच्छाशक्ती जबरदस्त हवी.

आजकाल नात्यातले, घरातले, कुटुंबातले ताणतणाव वाढले. त्याला कारण तुटत चाललेला संवाद. म्हणजे नको तिथे बोलायचे, व्यक्त व्हायचे. सोशल मीडियावर आपले ज्ञान पाजळायचे. पण जिथे संयमाने, विवेकाने व्यक्त व्हायचे, तिथे मात्र वाद घालत बसायचे. आपल्या वागण्या-बोलण्याने घरातील वातावरण बिघडते. कामाच्या ठिकाणी तणाव निर्माण होतो. माणसे नकळत दुखावली जातात. गैरसमज निर्माण होतात, याची आपल्याला खबरबात नसते. जाणीव असली तरी पर्वा नसते. या आपल्या वागणुकीमुळे आपणच आपले नुकसान करत असतो; आयुष्य बरबाद करत असतो, हेही आपल्याला समजत नाही. दारूच्या आहारी गेलेली व्यक्ती जशी निष्क्रिय, असंवेदनशील, असंतुलित होत जाते, तसेच या अविवेकी वर्तनाने आपणही एकटे पडत जातो. कारण एक लक्षात घेतले पाहिजे की, इतरांच्या संयमालाही मर्यादा असतात.



कुणी तुम्हाला किती अन् का सहन करायचे याचा विचार करा. भान ठेवा.

माझ्या आजीचे एक वाक्य मला सुभाषितासारखे आठवते. ती म्हणायची, 'माणसाने नेहमी गोड बोलावे. गोड बोलायला पैसा खर्चावा नाही लागत.' अगदी साधी सोपी शिकवण आहे ही. गोड बोला. कधीही कुणाला आपल्या वागण्या-बोलण्यानं दुखावू नका. आपण इतरांशी जसे वागू तसेच तेही आपल्याशी वागतील, हे लक्षात ठेवले पाहिजे. नेहमी मीच बरोबर हा अट्टाहास कामाचा नाही. दुसऱ्याच्या मताला मान द्यायला शिकले पाहिजे. आपण भलेही असहमत असू, पण विरोधासाठी विरोध ही वृत्ती नको. समंजसपणाची एक भूमिका अशी की, आधी सहमत व्हा किंवा तसा आभास निर्माण करा अन् मग आपले मत मांडा. आपली बाजू समजावून सांगा. अशा चर्चेत खेळीमेळीचे वातावरण असते. माझेच खरे या अट्टाहासाने तू तू मैं मैं असे लढाईचे समरांगण तयार होते. यातून जखमा होतात एकमेकांच्या मनाला. हे व्रण कायम राहतात. ते संबंध पूर्ववत व्हायच्या आड येतात. नवरा-बायकोचे संबंध, दोन मित्रातले संबंध, कामाच्या जागी सहकारी स्त्री-पुरुष संबंध या प्रत्येक नात्यातील गोडवा जपण्यासाठी आपण, म्हणजे प्रत्येकाने काही पथ्ये पाळणे गरजेचे आहे. आपल्याला संबंध टिकवायचे आहेत, तोडायचे नाहीत हे आपले साध्य हवे... उद्दिष्ट हवे. या आशेवरच आपले प्रत्येक पाऊल पडायला हवे. कुठेही संबंधाला तडा जातोय अशी शंका आली की, आपणच तत्काळ सावध व्हावे. एक पाऊल खुशाल मागे घ्यावे. त्याने काही बिघडत नाही. ती हार नसते. ते विजयासाठी टाकलेले दृढ पाऊल असते. बाण दूरवर जायचा असेल तर हातातील प्रत्यंचा मागे ओढावी लागते. धावण्याच्या शर्यतीत धावपटूचे एक पाऊल मागे असते. त्यामुळे आपण सुरुवातीला डिफेन्सिव्ह खेळलो तर त्यात कमीपणा नसतो. पुढच्या दृष्टीने ते फायद्याचेच ठरते.

संवादातील शांतता हा शब्दप्रयोग विचित्र वाटेल, पण न बोलताही संवाद साधला जाऊ शकतो. कवी, शायर मंडळी या मौनावर बरेच काही लिहून गेली आहेत; किंबहुना जे अनेक पानात सांगता येणार नाही ते कवितेच्या, गझलेच्या दोन ओळी सांगून जातात. बहिणाबाई सात-आठ ओळीत आयुष्याचे मोठे महत्त्वाचे तत्त्वज्ञान सांगून जाते. त्यामुळे आपण कमीत कमी बोलायला शिकले पाहिजे. दुसऱ्याचे संयमाने ऐकून घ्यायला शिकले पाहिजे. व्यक्त होताना शब्द जपून वापरले पाहिजेत. ही काळजी यासाठीही गरजेची असते. कारण आपला बोलण्याचा उद्देश कदाचित चांगलाही असेल. पण आपण वापरलेले शब्द, त्यावेळची ऐकणाऱ्याची मनःस्थिती, अवती-भवतीची त्या वेळची परिस्थिती यावरही बरेच काही अवलंबून असते. त्यामुळे दुहेरी सावधगिरी बाळगावी लागते.

कोणत्याही गैरसमजुतीचे भिजत घोंगडे ठेवण्यापेक्षा समोरासमोर बोलून असतील-नसतील ते गैरसमज संवादातून दूर करून घेणे हेही तितकेच महत्त्वाचे. चेंडू दुसऱ्याच्या कोर्टात टाकून आपण स्वस्थ बसायचे हेही धोरण चांगले नाही. खेळ सुरू राहण्यात गंमत असते अन् खेळ म्हटला की हार-जीत आलीच. तीही खेळीमेळीच्या भूमिकेतून स्वीकारली पाहिजे. नेहमी दुसराच जिंकेल असे थोडीच आहे! प्रत्येकाची वेळ येतेच कधी न कधी जिंकण्याची. अर्थात यासाठी वाट बघावी लागते. कधी कधी अपेक्षेपेक्षा जास्त संयमाची गरज असते. एक पाऊल मागे, स्वतःच स्वतःला शट-अप म्हणणे, संयम ठेवून खेळणे हेच आयुष्याच्या यशाचे गमक आहे.

७६५९०८४५५५

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# कॉपी-पेस्ट... सैयारा!

चित्रपटसृष्टी भारतीयांच्या मनात राहते. मूकपट, बोलपट, लघुपट, सिंगल स्क्रिन, मल्टिप्लेक्सेस आणि आता ओटीटी अशा प्रत्येक प्रकारातील दर्जेदार कलाकृतींनी लोकांच्या मनात अढळपद प्राप्त केले आहे. भारताच्या सांस्कृतिक जीवनातील बदलांचे प्रतिबिंब सिनेमात दिसते आणि त्याउलटही घडतेच. बॉलिवूडच्या प्रेक्षकांना स्वप्न विकणाऱ्या यशराज फिल्म्सच्या 'सैयारा'चे गारुड युवा पिढीवर चढले आहे. कोरड्या जेन झीच्या डोळ्यांत अश्रू आणणारा सैयारा हा 'अ मूमेंट टू रिमेंबर' या कोरियन चित्रपटाचा रिमेक असल्याची चर्चा थांबत नाहीये. दररोज वेगवेगळ्या माध्यमातून सैयाराच्या कॉपी-पेस्टची कथा नव्याने व्हायरल होतेय.

कोरोना टाळेबंदीदरम्यान हिंदी किंवा इंग्रजीमध्ये डब केलेल्या कोरियन टीव्ही मालिकांकडे भारतीय प्रेक्षकांचं लक्ष वळले. नेटफ्लिक्सची सर्वात यशस्वी मालिका 'स्क्विड गेम' ही कोरियनच आहे. यापूर्वी पॅरासाईट, क्रॅश लॅण्डिंग ऑन यू, इट्स ओके टू नॉट बी ओके, द क्विन्स क्लासरूम आणि 'के-ड्रामाज' हे चित्रपट भारतात लोकप्रिय आहेत. दुसरीकडे भारतीय सिनेसृष्टीची परंपरा जगप्रसिद्ध आहे. त्यातही प्रेमकथा आणि ती रंगविणारी युगुलगीतं, म्हणजे समस्त भारतीयांचा जिगर-कलेजा! दुःखान्त प्रेमकथा भारतीय प्रेक्षकांची दुखती नस आहे. पण, अस्सल कलाकृती बनविण्याचे भारतीय दिग्दर्शक-निर्मात्यांचे कौशल्य संपुष्टात आलेय की काय? असा प्रश्न सैयाराच्या यशानंतर निर्माण झाला आहे.

२००४ मध्ये कोरिया आणि जपानमध्ये 'ब्लॉक बस्टर अ मोमेंट टू रिमेम्बर' हा दक्षिण कोरियन रोमँटिक चित्रपट प्रदर्शित झाला. सैयारा हा 'अ मोमेंट टू रिमेम्बर'चा कॉपी असल्याची चर्चा आहे. गंमत म्हणजे या चित्रपटाची कथा 'प्युअर सोल' नावाच्या जपानी टीव्ही मालिकेवर बेतलेली होती. २०१२ मध्ये तुर्कीमध्ये 'इविम सेन्सिन' नावानं या चित्रपटाचा अधिकृत रिमेकही बनवण्यात आलाय. सैयाराच्या निर्मात्यांनी कदाचित भारतीय प्रेक्षकांचा आवाका जोखला नसावा. कारण, मग त्यांनी तीन भिन्न भाषा आणि प्लॅटफॉर्म्सवर प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचा हाफ रिमेक बनवून त्याला भारतीयांच्या भावनांचा तडका देण्याची चूक त्यांनी केली नसती. दोन्ही चित्रपट पाहिलेल्या काही कलंदर प्रेक्षकांनी दोन्ही चित्रपटातील सारखी दृश्ये टिपून त्यांना सोशल मीडियावर व्हायरल केली आहेत. मूळ चित्रपटावरून आम्ही प्रेरणा घेतली, असा दावाही केला जाईल.

दुःखदायक प्रेम, थरार आणि सुपरहीट गाणी म्हणजे मोहित सुरीचे चित्रपट! सुरीने २००५ मध्ये भट्ट फिल्म्सच्या 'जहर' या चित्रपटातून दिग्दर्शक म्हणून प्रवास सुरू केला. हा चित्रपट हॉलिवूडच्या 'आऊट ऑफ टाईम' (२००३) पासून प्रेरित होता. कोरियन चित्रपटांशी त्यांचं नातं २००७ मध्ये आलेल्या 'आवारापन' या चित्रपटापासून सुरू झालं. चित्रपटाची कथा दक्षिण कोरियन हिट चित्रपट 'अ बिटरस्वीट लाईफ' पासून प्रेरित होती. मोहित सुरीचा सुपरहिट 'मर्डर २' हा कोरियन चित्रपट 'द चेझर'पासून तर, आशिकी-२ हा हॉलिवूड चित्रपट 'अ स्टार इज बॉर्न' पासून आणि 'एक व्हिलन'मध्ये 'आय सॉ द डेव्हिल' या कोरियन चित्रपटाची प्रेरणा होती.

भारतीय प्रेक्षकांच्या गळी जुन्या कथा उतरवणारा मोहित सुरी पहिला आणि एकमेव नाही. बॉलिवूडवर वर्षानुवर्षे कोरियन चित्रपटांचा प्रभाव आहे. दिग्दर्शक संजय गुप्ता यांनी कोरियन क्लासिक मानल्या जाणाऱ्या 'ओल्ड बॉय'वर आधारित संजय दत्त-जॉन अब्राहमचा 'जिंदा' बनवला. त्यानंतर '७ डेज'वर आधारित इरफान-ऐश्वर्याचा 'जज्बा', सलमानचे 'राधे' आणि 'भारत' हे चित्रपट 'द आऊटलॉज' आणि 'ओड टू माय फादर' हे कोरियन चित्रपटांचे रिमेक होते.

बहुतेक कोरियन चित्रपट आणि मालिका भावनांचं एक संपूर्ण जग निर्माण करतात. कोरियन टीव्ही मालिका किंवा 'के-नाटक' बहुतेकदा तीव्र भावना आणि मानवी नातेसंबंधांवर केंद्रित असतात. आई-मुलीचं नातं, पहिलं प्रेम किंवा प्रौढत्वातील प्रेम! भारतीय प्रेक्षक या भावनांशी सहज जुळवून घेतात. सैयाराची हाऊसफुल्लची पाटी इतर निर्मात्यांनाही या कोरियन लाटेचा फायदा घेण्याकडे आकर्षित करणार आहे. दरम्यान, दिग्दर्शक आनंद राय आणि दक्षिणेचा सुपरस्टार धनुषचा २०१३ मध्ये आलेल्या रांझणा चित्रपटाने एका नव्याच वादाला तोंड फोडले आहे. एआयचा वापर करून या चित्रपटाच्या शेवट बदलून नवा व्हिडीओ व्हायरल केला आहे. या प्रकरणी आता न्यायालयात धाव घेण्याचा कलाकारांचा विचार आहे. येणाऱ्या काळात प्रेक्षक एखाद्या चित्रपटाचा शेवट, सुरुवात किंवा मधले एखादे दृश्य अगदी त्यांना हवे तसे बदलून घेतील आणि यासाठी कोणाची परवानगी घेण्याचीही गरज उरणार नाही. एकूणच हा प्रकार आपल्या मनोरंजन क्षेत्रापुढे असलेल्या नवीन आव्हानांचा शंखनाद आहे.

९८५०३३९२४०

## दखल

# फडणवीसांनी गेलेली हत्तीण खेचून आणली

**मोरेश्वर बडगे**

गेली काही दिवस राज्यातले राजकारण, राजकीय बातम्या बॅकफूटवर आहेत. चर्चा आहे ती एका महादेवी नावाच्या हत्तिणीची. चर्चा आहे ती मुंबईतल्या कबुतरखान्यांची. ही हत्तीण आणि ही कबुतरं हायकोर्टाच्या एका आदेशाने अडचणीत आली. कबुतरांच्या विष्ठेमुळे आरोग्याला धोका होतो, असा विषय पुढे आल्याने हायकोर्टाने सारे कबुतरखाने बंद करायला मुंबई महापालिकेला सांगितले. हत्तिणीचा मुद्दा थोडा वेगळा आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात नांदणी येथील जैन मठातील या हत्तिणीला गुजरातमधील 'वनतारा' पशुसंग्रहालयात पाठवण्यात आले. मठामध्ये तिच्या तब्येतीकडे दुर्लक्ष होते असा आरोप झाला. पुढे चाललेल्या खटलेबाजीत हायकोर्टच नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयानेही तिला पुनर्वसन केंद्रात न्यायला सांगितले तेव्हा कोल्हापूर जिल्ह्यात मोठे जनआंदोलन उभे झाले. हत्तीला जैन धर्मात पवित्र श्रद्धास्थानी मानले जाते. ही हत्तीण तर वयाच्या तिसऱ्या वर्षांपासून तिथे होती. कोल्हापूरकरांना तिचा लळा लागला होता. लाडिकपणे लोक तिला 'माधुरी' म्हणायचे. तुम्हाला राजेश खन्नाचा तो सुपरहिट 'हाथी मेरे साथी' चित्रपट आठवत असेल. थोडीफार तसलीच ही स्टोरी आहे. माधुरीला परत आणा म्हणून लोकांनी पदयात्रा काढल्या, मोर्चा निघाला. एका हत्तिणीसाठी तब्बल १५ दिवस कोल्हापूर जिल्हा प्रचंड अस्वस्थ होता. जामनगरचे हे पशू कल्याण केंद्र अंबानी यांच्या मालकीचे आहे. त्यामुळे विरोधकांनाही आयता राजकीय मुद्दा मिळाला. आमचे उद्योग गुजरातला पळवता. आता हत्तीही पळवायला लागले, अशी भावना लोकांमध्ये जोर मारू लागली. धार्मिक आणि भावनिक पातळीवरून ही हत्तीण पाहता पाहता राजकारणाचा केंद्रबिंदू बनली. अस्मितेचा मुद्दा बनलेल्या या हत्तिणीवरून पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण तापले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर आहेत. राजकारण्यांचाही रक्तदाब वाढला असणार; पण काय करणार? सुप्रीम कोर्टाचा आदेश निघाला होता.

सर्वोच्च न्यायालयानेच सांगितले तिथे मुख्यमंत्री आणि त्यांचे सरकार काय करू शकत होते? देवेंद्र फडणवीस यांना उगाच 'चाणक्य' म्हणत नाहीत. नांदणीचे मठवाले त्यांच्याकडे आले तेव्हा त्यांनी आपल्या पद्धतीने हा विषय हाताळला. चमत्कार झाला. जनभावना ठाऊक असताना महादेवीला घेऊन जाणारे 'वनतारा'वाले आता तिला परत करायला तयार झाले आहेत. नांदणीच्या मठानजीक जागतिक दर्जाचे हत्ती पुनर्वसन केंद्र उभारण्यात येईल. तेथे तिच्या तब्येतीची काळजी घेतली जाईल. राज्य सरकारच्या या प्रस्तावासाठी मदत करण्याची तयारी 'वनतारा'ने दाखवली आहे. पण तिच्या सुटकेचा आदेश सुप्रीम कोर्टाकडून आणावा लागेल. ज्यांनी तिला नेले तेच घेऊन जातो म्हणत असतील तर कोर्टालाही अडचण असण्याचे कारण नाही. कोल्हापूरकरांचा हा मोठा विजय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पुढाकार घेतला नसता तर हे शक्य झाले नसते. फडणवीसांच्या जागी दुसरा कोणी असता तर सुप्रीम कोर्टाचा मामला म्हणून हात वर केले असते. फडणवीसांनी तसे केले नाही. ते स्वतः कायद्याचे पदवीधर आहेत. त्यातूनही त्यांना ही दृष्टी लाभली असावी. लोकांचा दबाव, सरकारही विरोधात अशा परिस्थितीत 'वनतारा'च्या व्यवस्थापनाला वेगळा विचार करणे भाग पडले. त्यांनी तशी तयारी दाखवल्याने लवकरच महादेवी हत्तीण स्वगृही आलेली असेल. महादेवीचा ताबा घेण्याचा आमचा कुठलाही प्रयत्न नव्हता अशी सारवासारव आता 'वनतारा'वाल्यांनी चालवली आहे. तसे नव्हते तर मग काय होते? देशातल्या अनेक मोठ्या मंदिरांकडे स्वतःचे हत्ती आहेत. त्यांची काळजी ते घेतात. मग 'वनतारा'ला महादेवीचं का हवी होती हे कोडे आहे. गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर येथे हत्ती केंद्र आहे. तिथले हत्ती पळवण्याचा खूप प्रयत्न या लोकांनी केला. मात्र गावकऱ्यांनी तो हाणून पाडला. इतर अनेक राज्यातून 'वनतारा'ने असे अनेक हत्ती आणल्याचे बोलले जाते. त्यासाठीचे त्यांचे तंत्र ठरले आहे असे बोलले जाते. सुरुवातीला 'पेटा' या पशू कल्याण संस्थेकडून तक्रारी येतात. नंतर उच्चस्तरीय समिती बसवली जाते. मग मामला कोर्टात जातो. महादेवीलाही अशाच पद्धतीने कोल्हापूरहून नेले गेले काय? महादेवी ही पाळीव हत्तीण आहे. ती जंगलात राहू शकत नाही, ही गोष्ट हे मठवाले ओरडून ओरडून सांगत होते. 'वनतारा'ने त्याकडे दुर्लक्ष केले. महाराष्ट्र सरकार मध्ये पडले तेव्हा 'वनतारा' ती हत्तीण परत करायला कशी तयार झाली? कोल्हापूरकरांच्या मनातला संशय दूर करण्यासाठी 'वनतारा'ला पुढे यावे लागेल.



असाच विषय कबुतरखान्यांचा आहे. एकट्या मुंबईमध्ये तब्बल ५१ कबुतरखाने आहेत. यातले काही तर १००-१५० वर्षे जुने आहेत. कुठलीही तक्रार नाही. दादरचा कबुतरखाना तर 'हेरिटेज' म्हणजे ऐतिहासिक वारसास्थळ म्हणून जाहीर झाला आहे. अनेक वर्षांपासून कबुतर इथे येतात. आताच्या बंदीनंतरही दाणे टाकायला येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. धार्मिक भावनेतून हे सुरू आहे. ताडपत्री घालून महापालिकेने दादरचा कबुतरखाना बंद केला तेव्हा जैन समाज आक्रमक झाला. ताडपत्री फाडून लोक घुसले. कबुतरखाना बंद झाला हे लोकांना समजते. मात्र त्या कबुतरांना हे कसे सांगणार? थवेच्या थवे या भागात उडताना दिसतात. त्यांना दाणे टाकल्याने बुरशीचा संसर्ग होऊन आरोग्याला धोका पोचतो. कबुतरांच्या पिसांमुळे तसेच विष्ठेमुळे श्वासाचे आजार होतात, असा एक वैद्यकीय अहवाल पुढे आल्याने या कबुतरांवर संकट आले आहे. इतकी वर्षे काही झाले नाही मग आताच बंदी का? असा कबुतरप्रेमींचा सवाल आहे. हाही विषय फडणवीस यांच्याकडे आला आहे. ते कसा सोडवतात त्याकडे कबुतरप्रेमींचे लक्ष आहे. एरवी आपण बरे आणि आपला व्यापार बरा अशा मानसिकतेत जगणाऱ्या जैन समाजाची आक्रमकता अचंबित करणारी आहे. कबुतरखाना वाचवण्यासाठी जैन समाजाने घेतलेला आक्रमक पवित्रा हा नक्कीच चर्चेचा विषय आहे. राज्यात जैन धर्मीयांचे अनेक लहान-मोठे समुदाय आहेत. मराठीभाषी जैन समाजही मोठ्या संख्येने आहे. हा समाज प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली, पुणे आणि मराठवाड्याच्या काही भागात विखुरला आहे. मुंबईमध्ये प्रामुख्याने गुजराती जैन आढळतात. व्यापार-उद्योगात पुढे असलेला जैन समाज आतापर्यंत राजकारणात कधीही आक्रमक तर सोडा, सक्रियही नव्हता. मुळात हा समाज शांत, संयमी आणि अहिंसक आहे. प्राण्यांबद्दल प्रेमभाव हा या समाजाचा मोठा स्वभावगुण म्हणावा लागेल. परंतु, अलिकडे हा समाज भूमिका घ्यायला लागला आहे. ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदरमध्ये मराठी बोलायला नकार दिला म्हणून एका व्यापाऱ्याला मारहाण करण्यात आली होती. त्याच्या निषेधार्थ तेथील व्यापाऱ्यांनी काढलेल्या मोर्चात जैन समाजातील व्यापाऱ्यांचा पुढाकार होता. या समाजाच्या कॉलनीमध्ये मांसाहार करणाऱ्यांना परवानगी नाकारल्याच्या तक्रारी अधूनमधून कानावर येतात. ताडदेव भागातील मासळी बाजाराविरोधात तिथल्या लोकांनी हायकोर्टात धाव घेतली आहे. जैन समाजाच्या या सक्रियतेची त्यामुळे चर्चा तर होणारच. त्यात काही वाईटही नाही. एखादा समाज चांगल्या गोष्टीसाठी आवाज उठवतो तेव्हा एकूणच समाजाचा जिवंतपणा अधिक उठून येतो.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### राज्यातील कुपोषणाची समस्या केव्हा सुटणार?

ज्या महाराष्ट्रातील मेळघाटसारख्या स्थळांना कुपोषित जिल्हे म्हणून ओळखले जायचे तेथे आता साधनसंपत्ती भरपूर आहे. अशा राज्यातील अनेक महानगरे आणि जिल्ह्यात मध्यम व तीव्र कुपोषित बालकांची चिंता वाढली आहे. कुपोषण वाढीची कारणे तपासताना प्रथम सामाजिक विषमता, अन्न साखळीतील विस्कळीतपणा, अकार्यक्षम प्रशासन आणि लोकशिक्षणाची कमतरता हे सर्वांगीण घटक एकमेकांशी गुंतलेले स्पष्टपणे दिसून येतात. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लाखो कुटुंबांना ना पुरेशी आरोग्यसेवा उपलब्ध आहे ना स्वच्छ पिण्याचे पाणी, ना पोषणयुक्त अन्न. या कुटुंबांमध्ये शिक्षणाची पातळी खालावलेली असल्याने पौष्टिक आहाराची जाणीवच नसते. वाढती महागाई, बेरोजगारी आणि अनियमित उत्पन्न या सगळ्यामुळे मुलांना सकस आहार देणे आवाक्याबाहेरचे झाले आहे. शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी लागणारी कागदपत्रे, आधार कार्ड, बँक खात्यांचे तपशील, यामध्ये अनेक कुटुंबे अडकून पडतात. अंगणवाड्यांमध्ये खाद्यान्न व पूरक पोषण पुरवठ्याचे वेळापत्रक विस्कळीत असते. अन्नाचा दर्जा अतिशय निकृष्ट असतो, तर कधी कधी अन्नच उपलब्ध नसते. बालकांच्या वाढीवर लक्ष ठेवणारे आरोग्यसेवक अपुरे असतात आणि जे असतात ते अपूर्ण प्रशिक्षण घेतलेले असतात. शासनाच्या पोषण अभियानांना निधी दिला जातो. परंतु त्या निधीचा वापर वेळेत व पारदर्शकपणे होत नाही. जिल्हा आणि तालुका पातळीवर निधी अडवून ठेवण्याचे, चुकीच्या लाभार्थींची नोंद करण्याचे प्रकार खुलेआम आढळतात. याद्वारे खऱ्या गरजूंपर्यंत पोषण योजना पोहोचत नाहीत. आदिवासी आणि दुर्गम भागात ही स्थिती अधिकच भीषण असते. येथील लोकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते, ते फार वेळा सरकारच्या यंत्रणांपासून दूरच राहतात. आरोग्य तपासणी शिबिरे दुर्गम भागात पोहोचत नाहीत, त्यामुळे बालकांचे कुपोषण ओळखलेच जात नाही. उपासमारीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या समाजघटकांना केवळ शासकीय योजनांनी नाही, तर सामूहिक प्रयत्नांची पोषण देण्याची आवश्यकता आहे. बालकांचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक विकास थांबतो. ती मुले आजारांना बळी पडतात. त्यामुळे कुपोषण ही केवळ आरोग्याची नाही तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची गंभीर समस्या आहे. राज्य शासनाने यावर दीर्घकालीन उपाययोजना प्रभावशाली प्रामाणिकपणे राबविण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### स्वच्छतेसाठी पुढे या...

नागपुरात सोनेगावच्या हरिकृष्ण मंदिर परिसरात हल्ली सकाळी फिरायला जाणाऱ्यांची संख्या बरीच वाढली आहे. प्रवेशद्वाराच्या बाहेर फूड स्टॉल्स पण सज्ज असतात. ज्येष्ठ नागरिक समूहाचे वाढदिवस येथे साजरे केले जातात. तेथे डॉ. अभिषेक सांबरे व ग्रुपसोबत जाण्याचा योग आला. मात्र, तेथे पसरलेल्या कचऱ्यावरून लक्षात आले की, तेथे दारू पार्ट्या पण होत असाव्यात. इथे कचरापेटीची सोय कुठेच दिसली नाही. यासाठी मनपाला सल्ले देण्याऐवजी मी सामूहिक पातळीवर शक्य असलेले उपाय सुचवू इच्छिते. मनपा या ठिकाणी शिल्लक तिकीट ठेवून आवश्यक सोयी त्यातून उपलब्ध करू शकते. उदा. प्रवेशद्वारावर सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याद्वारे नागरिकांनी सोबत नेलेले डिस्पोजेबल किंवा प्लॅस्टिक मटेरियलची नोंदणी करणे, परिसराच्या आत ठरावीक अंतरावर कचरा पेटीची व्यवस्था करून प्रत्येकाला त्याचा वापर करायला भाग पाडणे.

**सुनीता मंजिरी इनामदार**/नागपूर

### स्वावलंबी, दीनदयालनगरात दूषित पाणी

स्वावलंबी आणि दीनदयाल नगरात गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना घाणेरडे दुर्गंधियुक्त आणि आरोग्यास हानिकारक पाणीपुरवठा केला जात आहे. या गंभीर समस्येकडे महानगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. अशी बातमी दिनांक ६ ऑगस्टच्या तरुण भारतात वाचण्यात आली. सध्या पावसाळा सुरू आहे. पावसाळ्यामध्ये मनपाने केलेल्या घरांच्या सर्वेक्षणांत शहरातील ७९८६ घरांमध्ये डास अळ्या आढळून आल्या, असे मनपाचेच वृत्त आहे. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे डासांमुळे उद्भवणारे डेंग्यू, मलेरिया व चिकुनगुनिया यासारखा आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. यामुळे शहरात मनपाकडून प्रभावी उपाययोजनेची गरज आहे. स्वावलंबी व दीनदयाल नगरात अनेक दिवसांपासून नळांमधून दुर्गंधियुक्त गढूळ आणि वापरण्यास योग्य नसलेले पाणी येत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. नागरिक सोशल मीडियावर सातत्याने तक्रारी करत आहे. शुद्ध पाणी मिळत नसल्यामुळे आणि रोगराईचे दिवस असल्यामुळे डॉक्टरच्या सांगण्याप्रमाणे अनेक जण वॉटर कॅन विकत घेऊन पिण्याच्या पाण्याची सोय करीत आहेत. सबब, मनपाकडून या समस्येचे त्वरित निराकरण होणे आवश्यक आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# उबाठा शिवसेनेचे महावितरणसमोर काळे झेंडे, थाळी बजाओ आंदोलन

## जिल्ह्यातील वीज पुरवठा, दुरूस्तीची कामे करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ ऑगस्ट**

शहरासह जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे वीजेच्या तारा लोंबकळत आहेत, अनेक भागात कमी दाबाने वीज मिळत आहे, काही ठिकाणी अव्वाच्या सव्वा वीजबिल देत मनमानी कारभार सुरू आहे. याबाबत विचारणा करण्यास गेलेल्या सर्वसामान्य नागरिकांना अधिकारी व कर्मचारी दाद देत नाहीत. उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. त्यामुळे शहरातील गोरगरीब आणि ग्रामीण भागातील लोक महावितरणच्या कारभारास कंटाळले आहेत. या विरोधात उबाठा शिवसेनेच्यावतीने दि ८ ऑगस्ट रोजी काळे झेंडे घेत जाहीर निषेध करीत सर्वसामान्यांचा आवाज महावितरणच्या कानापर्यंत पोहचण्यासाठी थाळी बजाओ आंदोलन करण्यात आले.

शहरासह जिल्ह्यात अनेक भागात महावितरण कंपनीची कामे पॉलीकॅप कंपनीला देण्यात आली आहेत. सद-रील कंपनी बोगस कामे करीत आहेत. काही ठिकाणी तर कामे न करता कोट्यावधी रूपयांची बिले उचलली असल्याचा आरोप प्रदेश संघटक वसीम देशमुख यांनी केला आहे. शहरातील मस्तानशहा नगर, महादेववाडी आदी ठिकाणी महावितरण कंपनीने ग्राहकांना वीज दिली आहे. पाचशे ते आठशे मीटरपर्यंत केबल ओढून वीज जोडणी केली आहे. महादेववाडी भागातील काही ठिकाणी वीज जोडणी नसतांना बिले आकारली जात आहेत. वीजबिला संदर्भात ग्राहक तक्रार करण्यासाठी गेले असता त्यांना चार चार तास ताटकळत कार्यालयात बसावे लागत आहे. लाईनमन पासून अधिकाऱ्यांपर्यंत ग्राहकांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे. ग्रामीण भागातही हीच परिस्थिती आहे. ग्राहकांच्या तक्रारी ऐकण्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळ नाही. महावितरणच्या गलथान कारभार दूर करण्यासाठी यापू-र्वी शिवसेनेचे वसीम देशमुख यांनी निवेदन दिले होते. यावेळी अधिकाऱ्यांनी तत्काळ कामे करण्याचे आश्वासन दिल्यामुळे आंदोलन मागे घेतले हाते परंतु महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची अरेरावी, मुजोरी कमी झाली नाही तसेच कामेही केली नाहीत त्यामुळे दि ८ ऑगस्ट रोजी वसीम देशमुख यांच्या नेतृत्वात जिल्हाप्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख, माजी जि प उपाध्यक्ष उध्दवराव गायकवाड, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरी व ग्रामीण भागा-तील नागरिकांनी महावितरण कार्यालयासमोर काळे झेंडे दाखवत महावितरणच्या गलथान कारभाराचा निषेध केला तसेच थाळी बजाओ आंदोलन करीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. अधीक्षके अभियंत्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले. यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आठवडाभरात वीज सुरळीत करण्याचे व दुरूस्तीची कामे करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ ऑगस्ट**

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागात दि ८ ऑगस्ट रोजी शुक्रवारी पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील यांची १२५ वी जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा करण्यात ाला.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे कृषी परिषद जिल्हा हिंगोली व जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय हिंग-ोली यांच्या वतीने साजरी करण्यात आली. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कृषी दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी जिल्हा अधीक्षक राजेंद्र कदम, कृषी उपसंचालक प्रसाद हजारे, तालुका कृषी अधिकारी शिव संदीप रणखांब आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि हितासाठी सतत प्रयत्न केले. त्यांच्यामुळे कृषी क्षेत्रात अनेक अमुलाग्र बदल झाले कृषी विभागातील सर्व कृषी योजना तळागाळातील सर्वसामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावा केला, असे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे कृषी परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष रवी सूर्यवंशी, जिल्हा सचिव शशिकांत देशमुख, कृष्णा कदम, जिल्ह्यातील सर्व प्रगतशील शेतकरी रामेश्वर मांडगे मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली– येथील यमुना निवास येथे भारतीय जनता पक्षाची बैठक घेण्यात आली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते यांनी हर घर तिरंगा व रक्षाबंधनाचा कार्यक्रम घरोघरी राबविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी युवाजिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शशीकांत वडकुते, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा सरचिटणीस सुनीता मुळे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, शहराध्यक्ष क्रिष्णा रूहीटीया, कैलाश शहाणे, हमीद प्यारेवाले यांच्यासह सर्व मोर्चाचे जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी तसेच ग्रामीण व शहरी भागातील पदाधिकारी, शक्तीकेंद्र प्रमुख आदींची उपस्थिती होती. यावेळी पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. छाया– विजय गुंडेकर**

# घरोघरी तिरंगा, स्वच्छता मोहीमेत नागरिकांनी सहभाग घ्यावा– सीईओ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ ऑगस्ट**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद हिंग-ोली यांच्या माध्यमातून शुक्रवार (दि.८)पासून १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत 'घरोघरी तिरंगा, घरोघरी स्वच्छता' स्वातंत्र्याचा उत्सव, स्वच्छतेसोबत ही मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली रमेश यांनी केले आहे.

जलशक्ती व सांस्कृतिक मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने देशभरात 'घरोघरी तिरंगा, घरोघरी स्वच्छता' स्वातंत्र्याचा उत्सव, स्वच्छतेसोबत (हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता : स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग) या टॅगलाईन अंतर्गत स्वातंत्र्य दिन विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट स्वातंत्र्याचा उत्सव लोकसहभागातून साजरा करणे आणि त्याचवेळी स्वच्छता, सुजलता व आरोग्याची जोड देणे असा असून, या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) संजय कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामस्थ, ग्रामपंचायती, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, बचत गट संघ, पंचायत राज इंस्टिस्ट्यूट, शालेय विद्यार्थी व स्वयंसेवकांना मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व जल जीवन मिशन अंतर्गत गावांमध्ये स्वच्छ सुजल गाव प्रतिज्ञा, सार्वजनिक स्वच्छता मोहीम, पाणी, स्वच्छता व आरोग्य या मालमत्तांची स्वच्छता करणे, जनजागृतीबाबत उपक्रम राबविणे, जलसंवर्धनाचे उपक्रम, १५ ऑगस्ट रोजी अमृत सरोवर व सार्वजनिक ठिकाणी ध्वजारोहण समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी 'हर घर स्वच्छता' व 'हर घरी तिरंगा' हे हॅशटॅग वापरून समाजमाध्यमांवर जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक गावातील प्रत्येक नागरिकाने यात सक्रिय सहभाग नोंदवून ही संकल्पना प्रत्यक्षात उतरव-ावी, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद हिंगोली यांच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात ही मोहीम व्यापक स्वरूपात राबविली जाणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी सांगितले आहे.


## संक्षिप्त वृत्त

### उबाठाचे ११ ऑगस्टला जनआक्रोश आंदोलन



हिंगोली– उबाठा शिवसेनेच्यावतीने दि ११ ऑगस्ट रोजी शेतकरी कर्जमाफी, वादग्रस्त मंत्री आदीसह विविध विषयांवर जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. यासंदर्भात शुक्रवार दि ८ ऑगस्ट रोजी येथील शासकीय विश्रामगृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे, गणेश शिंदे, माजी जि प उपाध्यक्ष उध्दवराव गायकवाड, वसीम देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जलेश्वर तलाव पूर्ण क्षमतेने भरला



हिंगोली– शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेला जलेश्वर तलाव गुरूवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे पूर्णपणे भरला आहे. आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पुढाकारामुळे तलावाचे सौंदर्यीकरण करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे या तलावातील लाखो ब्रास गाळ यावर्षी काढण्यात आला होता. तसेच तलावात येणारे घाण पाणी दुसरीकडे वळविण्यात आले आहे. त्यामुळे हा तलाव आता स्वच्छ पाण्याने भरला आहे. शहराच्या जलेश्वर मंदिर परिसरातील तलाव पाण्याने भरल्यामुळे याठिकाणचे सौंदर्य आता अधिकच वाढले आहे.

### साखरा, बोरखेडी परिसरात अतिवृष्टी

हिंगोली– सेनगाव तालुक्यातील साखरा, बोरखेडी तसेच हिवरखेडा शिवारात अतिवृष्टी झाली असून नदीचे पाणी शेतात शिरल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या सोयाबीनसह इतर पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. या भागातील पिकांचय नुकसानीचे तत्काळ पंचनामे करावेत अशी मागणी येथील शेतकरी करीत आहेत. जिल्हाभरात गुरूवारी रात्री मुसळधार पाऊस झाला आहे. नदी, नाले, ओढे तसेच नद्यांना पूर आला असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचे पहायला मिळत आहे.

# उपविभागीय कार्यालयात सार्वजनिक दसरा महोत्सव समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ८ ऑगस्ट**



येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात दि ८ ऑगस्ट रोजी सार्वजनिक दसरा महोत्सव समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

हिंगोली येथील दसरा महोत्सव संपूर्ण भारतात प्रसिध्द आहे. या दसऱ्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. त्यामुळे येथील दसरा मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो. नवरात्रापासून ते कोजागिरी पर्यंत दसरा महोत्सव साजरा केल्या जातो. दसरा पाहण्यासाठी जिल्ह्यासह राज्यातील लोक दरवर्षी येतात. कृषी प्रदर्शनीसह रामलीला सादर केल्या जाते. दसरा महोत्सवाला बासांपूजनाने सुरूवात केली जाते. तसेच विविध प्रकारचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आदींचे आयोजन केल्या जाते. यासंदर्भात नियोजन करण्यासाठी शुक्रवारी उपविभागीय अधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, खाकीबाबा मठाचे महंत कौशल्यादास महार-ाज, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, वकील संघाचे अध्यक्ष सुनील भुक्तार, गटविकास अधिकारी विष्णू भोजे, दौलत बनसोडे, प्रवीण रणवीर आदींची उपस्थिती होती. यावेळी झोक्याचे दर ६० रूपये प्रतिव्यक्ती निश्चित करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय मानवी तस्करीविरोधी दिनानिमित्त वडद येथे जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ ऑगस्ट**

आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी प्रतिबंध दिनानिमित्त वडद येथील जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जिल्हा बाल संरक्षण कक्ष, इन्स्टिट्यूट ऑफ सोशल अवेअरनेस अँड रिफॉर्म संस्था आणि दामिनी पथक यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात बाल कल्याण समितीचे सदस्य श्री. पी.आर. हेंबाडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, दामिनी पथकाच्या आरती साळवे, राहुल शिरसाट उपस्थित होते. बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत माहिती दिली. मुलीचे १८ आणि मुलाचे २१ वर्षांपूर्वी विवाह केल्यास तो कायद्याने गुन्हा ठरतो. गुन्हेग-ारास एक लाख रुपये दंड व दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामसेवक व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची जबाबदारी ठरवण्यात आली आहे. ग्रामस्तरावर ग्राम बाल संरक्षण समिती स्थापन करण्यात आली असून सरपंच हे अध्यक्ष व अंगणवाडी सेविका सदस्य सचिव असल्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सरस्वती कोरडे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना 'गुड' व 'बॅड टच'बाबत दामिनी पथकाच्या श्रीमती आरती साळवे यांनी म ार्गदर्शन केले. उमंग शिशुगृहाचे अधीक्षक राहुल शिरसाट यांनी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ आणि शिशुगृहाविषयी माहिती दिली. सामाजिक कार्यकर्ते रामप्रसाद मुडे यांनी जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना, दत्तक विधान व अनाथ प्रमाणपत्र योजनांची माहिती दिली. इन्स्टिट्यूट ऑफ सोशल अवेअरनेस अँड रिफॉर्म संस्थेच्या प्रकल्प समन्वयक अनिता भगत यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

विद्यार्थ्यांकडून बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञेची शपथ घेतली गेली. कार्यक्रमास बाल कल्याण समितीचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, आयएसएआर संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे शिक्षक, कर्मचारी, गावातील सरपंच, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खिलाडूवृत्ती दाखवत स्पर्धेत जिल्ह्याचा नावलौकीक वाढवा– राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ ऑगस्ट**



महाराष्ट्र राज्य फेन्सींग असोसिएशन व जिल्हा फेन्सींग संघाने अथक परिश्रम घेऊन ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित केली आहे. त्यामुळे सहभागी सर्व क्रीडापटूंनी खेळाडूवृत्ती दाखवत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

महाराष्ट्र फेन्सींग असोसिएशन व हिंग-ोली जिल्हा फेन्सींग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २७ वी महाराष्ट्र राज्यस्तरीय सब-ज्युनिअर फेन्सींग स्पर्धा २०२५चे आज दिम ाखात उद्घाटन करण्यात आले. आजपासून लिंबाळा मक्ता येथील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये ही स्पर्धा सुरु झाली आहे.

जिल्हा क्रीडा संकुलात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धेचे उदघाटक आमदार तान्हाजी मुटकुळे हे होते तर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता हे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पो-लीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. उदय डोंगरे, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, हिंगोली जिल्हा फ ेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष कल्याण देशमुख, प्रा. डॉ. बंकट यादव,उपाध्यक्ष प्रकाश कातोळे, राजकुमार सोमवंशी, शेषनारायण लोंढे, प्रा. पांडुरंग रणमाळ, राजेंद्र भांडारकर, दत्ता गलाले,राजू शिंदे, पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते यांची यावेळी उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हा क्रीडा संकुलात ही स्पर्धा आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करत खेळाडूंनी या स्पर्धेतील अनुभव सोबत घेऊन जावे. प्रत्येक स्पर्धेतून आपला अनुभव समृद्ध करून घेत यश मिळविण्यासाठी सतत प्रयत्नरत राहण्याच्या शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या स्पर्धेच्या म ाध्यमातून जिल्ह्यातील खेळाडूंना उत्तम व्यासपीठ मिळाले असल्याचे सांगून त्यांनी आपल्या खेळ कौशल्याचा उत्तम प्रत्यय देण्याचे सांगत स्पर्धकांमध्ये उत्साह वाढविला.

आमदार तान्हाजी मुटकुळे यांनीही फेन्सिंग हा आत्मसंरक्षणासाठी अत्यंत उपयुक्त क्रीडा प्रकार असल्याचे सांगून आयोजक व सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रथम प्रमुख मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन व दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा असोसिएशनच्या वतीने वृक्ष व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी हिंगोली जिल्हा फ ेन्सिंग संघटनेचे जिल्हाध्यक्ष कल्याण देशमुख यांनी स्पर्धेच्या आयोजनाबाबत प्रस्तावना केली. तसेच हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांचा संदेश प्रतिनिधी म्हणून प्रा. नरेंद्र रायलवार यांनी यावेळी वाचन केले.

या प्रसंगी संघटनेचे सचिव संजय भुमरे, विजय जऊळकर, अनिल कदम, सुशिल ईगोले, राष्ट्रीय खेळाडू संदीप वाघ, प्रसिद्धी प्रमुख गोपालराव सरनायक आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेचे सूत्रसंचालन श्रीमती वानरे हलगे-वानरे यांनी केले तर आभार महाराष्ट्र राज्य फेन्सिंग असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. उदय डोंगरे यांनी मानले.

१४ वर्षांखालील मुला-मुलींसाठी राज्यस्तरीय फ ेन्सिंग स्पर्धा असून, रविवार (दि.१०)पर्यंत जिल्हा क्रीडा संकुल, लिंबाळा (मक्ता), हिंगोली येथे सुरु राहणार आहे. या स्पर्धेचे हिंगोली जिल्ह्याला प्रथमच अशा दर्जेदार फेन्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान मिळाल्याने हिंगोलीसह सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वंचित बहुजन आघाडीची तालुकास्तरीय आढावा बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ ऑगस्ट -**

लोहारा शहरातील लोकवाचनालयात वंचित बहुजन आघाडीची तालुकास्तरीय आढावा बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत पक्षाच्या बळकटीसाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने जनसंपर्क ठेवावा आणि जनतेच्या प्रश्नांची प्रभावी सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष ॲड. प्रणित ढिकले यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, संघटनशक्ती आणि एकजुट हे विजयाचे मुख्य शस्त्र असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचे प्रतिनिधित्व वाढल्यास विकासाचे निर्णय अधिक परिणामकारकरित्या घेता येतात. त्यामुळे राजकीय सजगतेने काम करून संघटन आणि जनाधार मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा अनुराधा लोखंडे, उपाध्यक्ष रविकिरण बनसोडे, आर. एन. गायकवाड, अरुण गरड, नितीन सितापुरे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## संक्षिप्त वृत्त...



### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे श्री तुळजाभवानी देवी दर्शन

**तुळजापूर, दि.८ ऑगस्ट -**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री तुळजाभवानी देवीचे विधीवत दर्शन घेऊन पूजाअर्चा व आरती करत कुलधर्म व कुलाचार पार पाडले. या वेळी मंदिर संस्थानचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील हेही उपस्थित होते. दर्शनानंतर बावनकुळे यांनी श्री तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांनी कामांची माहिती घेतली आणि आवश्यक त्या सूचना दिल्या. मंदिर संस्थानच्या वतीने आ. पाटील यांनी महसूलमंत्र्यांचा श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा व कवड्याची माळ भेट देऊन सन्मान केला. या प्रसंगी तहसीलदार व व्यवस्थापक अरविंद बोळंगे, मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन उत्साहात संपन्न

**धाराशिव, दि.८ ऑगस्ट -**

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन निमित्त आगळे वेगळ्या पद्धतीने वृक्षांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने प्रशालेतील विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राख्या बांधून बहीण भावाचे नाते घट्ट केले. तसेच विद्यार्थिनींनी शाळेच्या परिसरातील वृक्षांना राख्या बांधून वृक्ष संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचा कृतीतून संदेश दिला. शाळेच्या परिसरातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी आणि प्रशालेतील शिक्षकांनी लावलेल्या वृक्षांना राख्या बांधून विद्यार्थ्यांवर निसर्गा प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला.

### पैगंबर जयंती उत्सव समितीची नवीन कार्यकारिणी जाहीर

**लोहारा, दि.८ ऑगस्ट -**

इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहंमद पैगंबर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी ईद-ए-मिलादुन्नबी उत्सव साजरा केला जातो. याच अनुषंगाने



लोहारा शहरात जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या जुलूसच्या नियोजनासाठी महेबूब सुभहानी दर्गाह येथे महत्वाची बैठक पार पडली. धर्मगुरू सय्यदशाह हुसेन कादरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड एकमुखाने करण्यात आली. यात अध्यक्षपदी माजी उपनगराध्यक्ष आयुब हबीब शेख, उपाध्यक्षपदी इस्माईल मुल्ला, सचिवपदी उपनगराध्यक्ष हाजी आमीन सुंबेकर, कोषाध्यक्षपदी इम्रान भोंगळे, कार्यध्यक्षपदी दादा मुल्ला आणि आयुब शेख यांची निवड झाली. तर सहसचिवपदी आमीन कुरेशी आणि नगरसेवक आरिफ खानापुरे यांच्यासह इतर सदस्यांची निवड करण्यात आली.



### बीटस्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत हरिओम जाधव यांचा पहिला क्रमांक

**इटकळ, दि.८ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील उमरगा (चि.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरीतील विद्यार्थी कुमार हरिओम एकनाथ जाधव यांनी बीटस्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावून शाळेचा गौरव वाढवला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष यांच्या संकल्पनेतून इंग्रजी भाषेतील प्रावीण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात स्पेलिंग बी उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत दि.५ ऑगस्ट रोजी मंगरुळ येथे झालेल्या मंगरुळ बीटमधील स्पर्धेत हरिओम जाधव यांनी इयत्ता तिसरीच्या गटातून अव्वल स्थान मिळवले. या यशाबद्दल शाळेत त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका शिलन कांबळे, शिक्षक एकनाथ कोरे, कुलकर्णी, विशाल सावंत आणि सोनाली सावंत यांच्या मार्गदर्शनाचा त्यांना लाभ झाला.

### उमरगा येथे दुचाकीची चोरी

**उमरगा, दि.८ ऑगस्ट -**

कसगी येथील सिद्दांना सुभाष कलशेट्टी यांची अंदाजे ३० हजार रुपयांची हिरो स्प्लेंडर दुचाकी (क्र. एमएच २५ झेड ३७१२) साई हॉस्पीटल, दत्त मंदिर परिसरातून २९ जुलै रोजी अज्ञाताने चोरून नेली. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## जनतेच्या पैशातून विकास आराखडा; सत्कार मात्र आमदाराचा आणि महसूलमंत्र्याचा...

# ड्रग्स माफियाला वाचवण्यासाठी पत्रकार परिषदेत वाटल्या प्रतिज्ञापत्राच्या पत्रावळी

महसूलमंत्र्यांनी स्वीकारला ड्रग्स माफियाकडून सत्कार... | सत्कारात लाखो रुपयाची उधळण... | २० जेसीबी, अर्धा तास सुरु होती अतिषबाजी...



### पत्रकार परिषदेतील प्रतिज्ञापत्राची पत्रावळ...

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जोर धरत असताना, यावर पडदा टाकण्यासाठी एक विचित्र घटना घडली. आ. राणाजगजितसिंह पाटील दि. ८ रोजी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी या आरोपांना उत्तर देण्याऐवजी, एक अत्यंत अजब प्रकार केला. ड्रग्स माफियांना वाचवण्यासाठी त्यांनी पोलिसांनी न्यायालयात दिलेले एका कोऱ्या पेपरवर प्रतिज्ञापत्रांच्या पत्रावळी पत्रकारांना वाटल्या. या पत्रावळीत नक्की काय लिहिले होते, हे स्पष्ट झाले नाही, पण हे कृत्य केवळ आरोपांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट होते. यातून मंत्र्यांची नैतिक जबाबदारी आणि प्रशासनाची विश्वासार्हता पुन्हा एकदा धोक्यात आली आहे.

### विकास आराखड्यावर प्रश्नचिन्ह? पैसा कोणाचा?

याच भागात जनतेच्या पैशातून मोठा विकास आराखडा आखला जात आहे. ज्याचा उद्देश नागरिकांचे जीवनमान सुधारणे हा आहे. पण, या विकास कामांचे श्रेय मात्र आमदार आणि महसूलमंत्री घेताना दिसतात. विकासकामांचे उद्घाटन असो किंवा पायाभरणी, या सोहळ्यांमध्येही कोट्यवधी रुपयांची उधळण केली जाते. आता याच भागात झालेल्या माफियाच्या सत्कार सोहळ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासाचे श्रेय घेणारे नेते, ड्रग्स माफियांकडून घेतल्या जाणाऱ्या सत्कारात मात्र शांतपणे उभे राहतात. ही दुहेरी भूमिका समाजासाठी अत्यंत घातक आहे. यावर विचार करणे आवश्यक आहे की, आपण निवडलेले प्रतिनिधी खरोखरच जनतेच्या हितासाठी काम करत आहेत की गुन्हेगारांना पाठिंबा देत आहेत?

### राजकीय शक्ती आणि गुन्हेगारीचा अभद्र संबंध

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ ऑगस्ट -**

राजकीय नेते आणि गुन्हेगारी जगतातील संबंध किती खोलवर रुजले आहेत, याचा प्रत्यय नुकताच एका धक्कादायक घटनेतून समोर आला आहे. शहरातील एका मोठ्या ड्रग्स माफियाच्या सत्कार सोहळ्याला राज्याचे महसूलमंत्री उपस्थित राहिले. विशेष म्हणजे, या सत्कारात माफियाने कोट्यवधी रुपयांची उधळण केली. हा सोहळा केवळ पैशाच्या उधळपट्टीपुरता मर्यादित नव्हता, तर त्यात प्रचंड धुमाकूळ घालण्यात आला. २० जेसीबी मशीन, अर्धा तास चाललेली आतषबाजी, आणि ध्वनी व वायू प्रदूषणाची पर्वा न करता झालेला हा कार्यक्रम अनेक प्रश्न निर्माण करत आहे. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेण्याऐवजी पोलीस आणि नगरपालिका प्रशासन मूकदर्शक बनून राहिले, ज्यामुळे प्रशासनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

गेल्या काही वर्षांपासून शहरात ड्रग्सचा सुळसुळाट वाढला आहे. तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या खाईत लोटली जात असताना, यामागे काम करणाऱ्या माफियांचा तपास करण्याची जबाबदारी ज्या प्रशासनावर आहे, तेच प्रशासन राजकीय दबावाखाली झुकताना दिसत आहे. याचाच पुरावा म्हणून, नुकताच महसूलमंत्र्यांच्या उपस्थितीत एका कुख्यात ड्रग्स माफियाने भव्य सत्कार सोहळा आयोजित केला. या सोहळ्याला महसूलमंत्री स्वतः उपस्थित होते.

या सत्कारात लाखो रुपयांची उधळण करण्यात आली. सत्कार घेणारे मंत्री महोदय आणि सत्कार करणारे माफिया, यांच्यात असलेला हा संबंध राजकारणाचे गुन्हेगारीकरण किती वाढले आहे, हे दर्शवतो. अशा सार्वजनिक सोहळ्यांमध्ये माफियांचे अशा प्रकारे सत्कार होणे, हे समाजाला कोणता संदेश देत आहे? एक प्रकारे, गुन्हेगारांना राजकीय संरक्षण मिळत असल्याचेच हे द्योतक आहे.

या सोहळ्यात झालेले प्रचंड ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषण अत्यंत गंभीर होते.

२० जेसीबी मशीन एकाच वेळी रस्त्यावर आणून, त्यांच्या साहाय्याने करण्यात आलेली आतषबाजी, अर्धा तास चाललेला फटाक्यांचा आवाज आणि धूर, या सगळ्यांमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. सर्वसामान्य नागरिकांना साध्या कार्यक्रमांसाठी परवानगी घेण्यासाठी अनेक सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात, तर दुसरीकडे अशा प्रकारच्या बेकायदेशीर कार्यक्रमांना मोकळीक कशी मिळते? या कार्यक्रमाला कोणतीही परवानगी नव्हती, असे सांगण्यात येत आहे.

तरीही पोलीस प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाने यावर कोणतीच कारवाई केली नाही. स्थानिक पोलीस अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांनी 'मुग गिळुन गप्प' राहणे पसंत केले. हे प्रशासनाचे अपयश आहे की राजकीय दबावाखाली घेतलेली भूमिका आहे, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

या घटनेमुळे सामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात मोठी नाराजी आहे.

## विजेच्या धक्क्याने दुभती गायीचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील सिंदगाव येथे विजांच्या कडकडाटासह झालेल्या पावसात दुभती गायीवर वीज कोसळून तिचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



ही घटना गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारास २ वाजता घडली. दुपारी अचानक ढगांचा गडगडाट व विजांचा कडकडाट सुरू झाला आणि काही वेळ जोरदार पाऊस झाला. याच दरम्यान सिंदगाव शिवारातील गट क्र.१०३ मध्ये असलेल्या शेतातील झाडाला बांधलेल्या राजेंद्र अमृतराव पाटील यांच्या दुभती गायीवर थेट वीज कोसळली. वीज कोसळल्याने गायीचा जागीच मृत्यू झाला असून, या घटनेत पाटील यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. गावकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

## शेतकऱ्यांच्या अकरा मागण्यांचे निवेदन महसुलमंत्र्यांना सादर

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ ऑगस्ट -**

शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध अकरा मागण्यांचे निवेदन राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आले.

महसुलमंत्री बावनकुळे हे सध्या धाराशिव जिल्हा दौऱ्यावर असून, ७ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनता दरबारात त्यांनी नागरिक व शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

यावेळी तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान, अतिवृष्टी अनुदान, पीकविमा आदी मागण्यांसह एकूण अकरा मागण्यांचे निवेदन शेतकरी संघर्ष समितीने सादर केले.



याबाबत प्रतिसाद देताना महसुलमंत्री बावनकुळे यांनी लवकरच मंत्रालयात बैठक घेऊन शासनस्तरावर मागण्यांबाबत सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.


याप्रसंगी शेतकरी संघर्ष समितीचे दिलीप जोशी, सरदारसिंग ठाकुर, व्यंकट पाटील, महादेव बिराजदार, अशोक पाडोळे, गुलाब शिंदे, आजमोद्दीन शेख, बालाजी ठाकुर, लक्ष्मण निकम, दिलीप पाटील, काशिनाथ काळे, तोलु पाटील, प्रताप ठाकुर, सचिन जवळगे, स्मिताबाई हांडे, छोटुसिंग ठाकुर, दशरथसिंग ठाकुर व कालिदास जाधव आदी उपस्थित होते.

## संभव प्रतिष्ठानतर्फे जिल्हास्तरीय पुरस्काराचे आज वितरण

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.८ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव येथील संत तुकाराम सामाजिक संस्था आणि केशेगाव येथील संभव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने, साहित्य सूर्य अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींना जिल्हास्तरीय आदर्श समाजसेवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या सोहळ्यात सामाजिक कार्य, कला, पत्रकारिता, शैक्षणिक क्षेत्र, पोलीस प्रशासन व साहित्य या क्षेत्रात लक्षणीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान होणार आहे. कार्यक्रमासाठी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, उमरगा आमदार प्रविणजी स्वामी, लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक विष्णुभाऊ कसबे, माजी जि.प. सदस्य दिपक जवळगे, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामचंद्र आलुरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, माजी प्राचार्य संगमेश्वर जळकोटे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



पुरस्कारासाठी निवड झालेल्यांमध्ये नगीनाताई कांबळे, बजरंग ताटे, ईश्वर क्षीरसागर, शिवाजी गायकवाड, अशोक जाधव, विकास कसबे, जोशीलाताई लोमटे, किसन देडे, मिनाक्षीताई पेठे, रुपेश डोलारे, युवराज शिंदे, अहेमद शेख, राजीव कसबे, पांडुरंग घोडके, भारत गायकवाड, अरुण लोखंडे, डॉ. किशोर जोगदंड, एस.के. गायकवाड, दादासाहेब बनसोडे, सुनिताताई भोसले, किशोर जाधव, लक्ष्मण क्षीरसागर, चंद्रकांत कांबळे, बालाजी गायकवाड आणि ॲड. विलास साबळे यांचा समावेश आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा दि.९ ऑगस्ट रोजी इटकळ येथील साई मंगल कार्यालयात पार पडणार असल्याची माहिती आयोजक दयानंद काळुंके व तुकाराम क्षीरसागर यांनी दिली आहे.

## धाराशिव शहरातील कचरा डेपो इतरत्र हलविण्याची 'उबाठा' गटाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ ऑगस्ट -**

धाराशिव शहरातील ख्वॉजा नगर ते उमर मोहल्ला या भागात रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. ते उचलावे तसेच त्या भागातील नाल्या तुंबल्या असून त्या तात्काळ स्वच्छ कराव्यात. विशेष म्हणजे शहरातील कचरा डेपोतील दुर्गंधीयुक्त कचऱ्याचा शहरवासियांना त्रास होत आहे. त्यामुळे त्या कचऱ्याची विल्हेवाट लावून तो कचरा डेपो तात्काळ इतरत्र हलविण्यात यावा, अशी मागणी शिवसेना (ठाकरे) च्यावतीने नगर परिषदेच्या मुख्याधिकारि नीता अंधारे यांच्याकडे दि.८ ऑगस्ट रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे.

**न.प. मुख्याधिकारी निवेदन सादर...**

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव शहरातील ख्वॉजा नगर, उमर मोहल्ला, गणेश नगर, फकीरा नगर, तुळजापूर नाका, जुना बस डेपो, इंगळे गल्ली, देशपांडे स्टॅन्ड,अगड गल्ली या भागातील नागरिकांसह शहरवासियांना या कचरा डेपोतील दुर्गंधीयुक्त कचऱ्याचा प्रचंड त्रास होत आहे. खीरणी मळा, रसूलपुरा व लहुजी चौक या भागामध्ये रस्ते व नाली करण्यात यावी. तर तुंबलेल्या नालीमधील कचरा काढून तो उचलून स्वच्छ करण्यासह पोलवरील लाईट सुरू कराव्यात यासह आदि मागण्या या निवेदनात केल्या आहेत.

सदरील निवेदना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## महसूल मंत्र्यासमोर शरण पाटील यांनी मांडल्या शेतरस्त्यांच्या समस्या

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.८ ऑगस्ट -**

उमरगा-लोहारा तालुक्यातील शेतरस्त्यांच्या गंभीर समस्यांवर तातडीने उपाययोजना करून कामांना प्राधान्य द्यावे आणि शासनाने या कामांसाठी निधी वाढवावा, अशी ठाम मागणी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष व भाजप युवा नेते शरण पाटील यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली.

मुरूम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना व शरण पाटील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शेतकरी मेळाव्यात ही मागणी करण्यात आली.



या वेळी मंत्री बावनकुळे म्हणाले, राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज, दिवसा १२ तास वीजपुरवठा आणि घरगुती विजेचे दर कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पुढील पाच वर्षांत राज्यातील सर्व शेतरस्ते १२ फूट रुंदीचे करून त्यांचे डांबरीकरण करण्यात येईल.

त्यांनी पुढे सांगितले की, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) तंत्रज्ञानाचा वापर करून हवामानाचा अचूक अंदाज, रोग-किडीचा पूर्व इशारा, मातीची गुणवत्ता आणि पिकांचे उत्पादन याबाबत शेतकऱ्यांना अचूक माहिती मिळेल. यामुळे खर्च कमी होऊन पर्यावरणावरचा ताणही घटेल.

या मेळाव्यात माजी मंत्री बसवराज पाटील यांनी मराठवाड्याला हक्काचे पाणी, बंद पडलेले कारखाने पुन्हा सुरू करणे, नव्या उद्योगांना प्रोत्साहन, तसेच जिल्हा बँकेला मदत यांसारख्या मागण्या मांडल्या.

मेळाव्यात आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा बँक अध्यक्ष बापुराव पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, प्रा. सुरेश बिराजदार, युवा नेते शरण पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. पाऊस आणि रात्रीचा उशीर असूनही हजारो शेतकरी व नागरिकांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

## दुचाकीवरून पडून एकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.८ ऑगस्ट -**

केसरजवळगा (ता. उमरगा) येथील राजेंद्र महादेव पाटील (वय ४२) यांचा मोटरसायकल अपघातात मृत्यू झाला.

२४ एप्रिल रोजी पाटील हे मोटरसायकलवरून जात असताना महालिंगराय वाडी शिवारातील सुभाष महानु यांच्या शेताजवळ मोटरसायकल त्यांनी हायगयी व निष्काळजीपणे चालवल्याने ती घसरली.

यात पाटील हे खाली पडून गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# चोरीचे पाच गुन्हे उघड; १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ ऑगस्ट -**

विमानतळ पोलिसांनी जबरी चोरीचे पाच गुन्हे उघडकीस आणले असून, दोन जणांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी दहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.



दि.३० जुलै रोजी रात्री नऊच्या सुमारास विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उर्मिला लक्ष्मण सोनटक्के रा.नाईकनगर नांदेड या आपल्या मुलीसोबत शतपावली करीत असताना दोन अनोळखी इसमांनी मोटारसायकलवर येवून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरीने चोरुन नेली. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याच्या अनुषंगाने विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सितांबर कामठेवाड यांनी या गुन्ह्या संबंधाने सीसीटीव्ही फुटेज तपासले. आसना पुलाखाली हे दोन जण संशयितरित्या थांबलेले असल्याची गोपनिय माहिती मिळाल्यावरुन विमानतळ पोलीस ठाण्याच्या पथकाने त्या दोघांना अटक केली. महेश बबन देवकत्ते रा.अंबानगर व सय्यद जाकेर सय्यद जफर रा.महेबूबनगर अशी यांची नावे आहेत. त्यांच्या ताब्यात असलेल्या मोटारसायकलीविषयी पोलिसांनी चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी त्यांना अटक करुन विमानतळ पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता दोन्ही आरोपींनी गुन्हे केल्याचे कबूल केले. या कारवाईत पोलिसांनी विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या गुन्ह्यातील सोन्याचा तुकडा, १० ग्रॅम सोन्याचे गंठण, पोलीस स्टेशन शिवाजीनगर हद्दीतील गुन्ह्यातील २० ग्रॅम सोन्याचे गंठण असा एकूण पाच गुन्ह्यातील ८२ ग्रॅम सोन्याचे दागिणे व एक प्लसर मोटारसायकल असा एकूण १० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. हि कारवाई पोलीस निरीक्षक सितांबर कामठेवाड, सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे, पोहेकॉ. शेख जावेद, बालाजी पांचाळ, पोहेकॉ. शेख शोएब, राजेश माने आदींनी केली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सितांबर कामठेवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांची उपस्थिती होती.

# किनवट न्यायालयासाठी ८३.४२ लाखांचा निधी मंजूर

## खा. अशोक चव्हाण यांच्या मागणीला पालकमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ ऑगस्ट -**

किनवट न्यायालयाच्यचे कामकाज नगरपालिकेच्या इमारतीमध्ये सुरळीत सुरू करण्यासाठी आवश्यक भौतिक सुविधा निर्मितीसाठी तब्बल छ८३ लाख ४२ हजार ७४० रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. माजी मुख्यमंत्री व खासदार अशोकराव चव्हाण यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे केलेल्या मागणीला ७ ऑगस्ट रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या मागणीला तत्काळ प्रतिसाद देत निधी मंजूर करून दिल्याबद्दल न्यायालयीन कर्मचारी, वकील व पक्षकार यांनी आनंद व्यक्त करून दोघांचेही आभार मानले आहेत.

सध्या किनवट न्यायालय निजामकालीन जीर्ण इमारतीतून स्थलांतरित होऊन नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज मंगलकार्यालयात तात्पुरते चालते आहे. मात्र तिथे सुविधा अपुऱ्या असल्याने न्यायालयीन कामकाजात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर चार स्वतंत्र न्यायालयीन कक्ष दोन दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, एक जिल्हा न्यायाधीश आणि एक दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर उभारण्याचे नियोजन आहे. नगरपालिकेकडून सादर केलेल्या अंदाजपत्रकातून न्यायदालन, न्यायाधीश कक्ष, अभिलेख कक्ष तसेच विविध विभागीय कार्यालये सुसज्ज करण्याचा आराखडा आहे.

सदर मागणीचे गांभीर्य पाहता खा. चव्हाण यांनी हा विषय पुढे नेताच ना. सावे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत निधी मंजुरीची प्रक्रिया गतीमान केली. जिल्ह्यातील विकासप्रश्न सोडविण्यातील तत्परता हे खा. चव्हाण यांचे वैशिष्ट्य असून, ते केवळ एका मतदारसंघापुरते मर्यादित न राहता संपूर्ण जिल्हा व मराठवाड्यासाठी सतत शासनदरबारी पाठपुरावा करतात. किनवट व माहूरसारख्या दुर्गम भागातील नागरिकांना न्याय मिळविताना होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असून, नवीन इमारतीमुळे न्यायालयीन कार्यक्षेत्र अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि आधुनिक होईल.

**न्यायदान प्रक्रिया गतीमान होईल**

खा. चव्हाण यांनी विकासकामांबाबत दाखवलेली तत्परता आणि ना. सावे यांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे हा प्रस्ताव वेगाने मार्गी लागला. ग्रामीण भागातील जनतेस न्यायप्राप्तीची सोय अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि आधुनिक होणार असून न्यायदान प्रक्रिया गतीमान होईल, असा विश्वास नागरिक व वकीलवर्गाने व्यक्त केला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पाटनुर येथे महाराजस्व समाधान शिबीर

**अर्धापूर**-महसूली प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येत आहे. गाव पातळीवर लोकांची कामे व्हावीत यादृष्टीने या शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी या शिबीराचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी केले.



तहसील प्रशासन अर्धापूर यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानचे आयोजन तालुक्यातील पाटनुर येथे करण्यात आले. यावेळी विविध योजनांची माहिती देवून लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ दिला. जिवंत सातबारा मोहिमे अंतर्गत वारसा फेरफार मंजूर करून खातेदारांना सातबाराचे वितरण करण्यात आले. ग्रीस्टॅक योजना, पिक विमा योजना,पिक पाहणी, कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास तहसिलदार रेणुकादास देवणीकर, सहाय्यक गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम, तालुका कृषी अधिकारी विशाल बि-हाडे,सरपंच भागजी येळणे, उपसरपंच समाधान पाटील शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी एस.एम.तरोडे, ग्रा.पं. सदस्य मधुकरराव देशमुख, सुरेश पंतगे,ड.विशाल परदेशी,आ.वि.आ. डॉ.एस.पी.गोखले, ॲड.डि.बी.दासे, एक.आर.चाऊस, फाटेकर, गजानन पत्रे आदींची उपस्थिती होती. ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी लवकर निकाली काढणे हे या शिबीरांच्या माध्यमातुन सुलभ होणार असल्याचे यावेळी तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी सांगितले. तर सामाजिक न्यायविभागाच्या विविध योजनांचा लाभ, राशन कार्ड, ग्रीस्टॅक, जिवंत सातबारा, पीएम किसान आदीचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी करावी असे आवाहन तहसिलदार यांनी केले. यावेळी संभाजी शिंदे, संतोष यलसटवाड, गजानन रेनेवाड, ग्रामरोजगार सेवक देविदास बिऱ्हाडे, बालाजी काळे,गोविंदराव देशमुख, सिताराम नांदेडकर, मारोती सोनटक्के,परमेश्वर कोकाटे, बाबुराव बिऱ्हाडे, किरण बिऱ्हाडे आदींची उपस्थिती होती. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी नविन रेड्डी, ग्राम महसूल अधिकारी प्रेरणा राऊत, सोनाली काकडे, बालाजी वसमतकर, रवि अंबुरे, लक्ष्मण देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

### उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे अवयव दान रॅली

**देगलूर**-शहरातील उपजिल्हा रुग्णालय येथे अंगदान जीवन संजीवनी अभियान योजने अंतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. दि ०३ ऑगस्ट या दिवशी भारतातील पहिली हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली होते म्हणून हा दिवस भारतात 'अंगदान दिवस' म्हणून साजरा केला जातो. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके , डॉ. राजाभाऊ बुट्टे, सहायक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हिरवी झेंडा दाखवून रॅलीस सुरुवात केली. तसेच अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी फेरीस अंगदान जीवन संजीवनी अभियाना विषयी महत्व आणि मार्गदर्शन केले. डॉ. जी. ए. गायकवाड नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, व वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर यांच्या कॉलेज चे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आणि विद्यार्थीनिंनी रॅलीत सहभाग घेतला. या अभियान रॅलीत उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथील जेष्ठ वैद्यकीय अधिकारी: डॉ. अनिल थडके,डॉ. विश्वनाथ मलशेटवार, डॉ. सचिन गायकवाड, डॉ. सचिन जांबकर,डॉ. मो. उस्मान, डॉ.शेख अब्दुल मुजीब,डॉ. संजय लाडके, डॉ.संजय इंगळे, डॉ.शेख नजीब अहेमद, डॉ.शेख शहानवाज, स्त्रीरोग चिकित्सक, डॉ. अब्बाशी अयमन फातिमा, डॉ. मोना ओहळ, डॉ. गोदावरी सावळे, डॉ. फरहीन फारूखी, अधीपरिचारिका मनिषा बोईनवाड, गौसिया मोमिन, रेणुका धुमाळे, मनिषा गोंदे, प्रियंका गिरी, समन्वयक छाया पाटील, अनिता, औषध निर्माण अधिकारी संतोष मुंगीलवार, विकी पाईकराव,आरोग्य मित्र शेख अहेमद,वै. धुंडा महाराज देगलूरकर कॉलेज चे प्राचार्य प्रकाश पाटील, व सर्व प्राध्यापक, डॉ. जी. ए. गायकवाड नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य आणि प्राध्यापक , रमेश जाधव, संदीप गवलवाड, शिवकुमार रावसाहेब, सुरेखा शिंदे, सुरेश सावते, मोरे दिगंबर व उपजिल्हा रुग्णालय, देगलूर चे सर्व अधिकारी, स्टाफ, कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# गुप्तदान करण्याच्या बहाण्याने महिलेची २ लाखांची फसवणुक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ ऑगस्ट -**

लोहा तालुक्यातील कारेगाव येथील कृष्ण मंदिरात एका महिलेस बोलावून मंदिरात गुप्तदान द्यायचे आहे, पुजा झाल्यानंतर ते परत करु असे सांगून तिचे १ लाख ८० हजार रुपयांचे दागिणे घेवून पोबारा केल्याप्रकरणी लोहा पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

काल लोहा तालुक्यातील कृष्ण मंदिरात गिरजाबाई अरुणराव दिघे रा.कारेगाव या जात असताना मोटारसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी सदर महिलेला थांबविले. आणि मंदिरात गुप्तदान करायचे आहे, त्याची पुजा झाल्यानंतर ते दान परत करण्यात येईल असे सांगितले आणि तिच्याजवळील १ लाख ८० हजार रुपयांचे दागिणे नजर चुकवून पळवून नेले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर काल सायंकाळी गिरजाबाई दिघे या महिलेने लोहा पोलीस ठाणे गाठून अज्ञात दोन आरोपीविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिर नरसी कावड यात्रेला शिवभक्तांचा अभूतपूर्व प्रतिसाद !

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ८ ऑगस्ट -**

श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर हर हर महादेव च्या जयघोषात भक्तिमय उत्साहात काढण्यात आलेल्या नृसिंह मंदिर श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिर नरसी या कावड यात्रेला नरसी व पंचक्रोशीतील शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.गेल्या तीन वर्षांपासून कावड यात्रेच्या महाप्रसादाचे मानकरी असलेले माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी यावर्षी देखील सिद्धेश्वर महादेव मंदिर येथे महाप्रसादाचे भव्य आयोजन केले होते.यावेळी तीन हजार पेक्षा अधिक भाविकांनी या महाप्रसाद सोहळ्यात उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतला.



नरसी नगरीचे धार्मिक वैभव उंचावणाऱ्या श्रीक्षेत्र राहेर ते नरसी कावड यात्रा सोहळ्यात प्रतिवर्षी शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग वाढत असून यावर्षी महिलांची उपस्थिती लक्षणीय ठरली.बुधवारी भल्या पहाटे श्रीक्षेत्र राहेर येथील ऐतिहासिक हेमाडपंथी नृसिंह मंदिर व पवित्र गोदापात्रात माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे व इतर शिवभक्तांच्या सानिध्यात महाआरती करून वेदशास्त्र संपन्न संदीप महाराज जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गोदामातेची मनोभावे आराधना करण्यात आली.

शेकडो शिवभक्त कलशात पवित्र गोदावरीचे जल भरलेली कावड खांद्यावर घेवून बम बम भोलेच्या गजरात नरसीच्या दिशेने पायी मार्गस्थ झाले.या दरम्यान ठिकठिकाणी कावड यात्रेतील शिवभक्तांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.या पायी यात्रेत शिवभक्तांच्या सुविधेसाठी योगदान देणाऱ्या भक्तांचा श्रावण पाटील भिलवंडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी वे.शा.स.संदीप महाराज जोशी यांचे भक्तिमय प्रबोधन देखील पार पडले.देवाधिदेव महादेव यांची गगनचुंबी प्रतिमा कावड यात्रेचे मोठे आकर्षण ठरली.

कावड यात्रेत सहभागी झालेल्या असंख्य महिलांसह सर्व शिवभक्तांनी यात्रा नरसीत पोहचल्यानंतर येथील सुप्रसिद्ध सिद्धेश्वर मंदिरातील महादेवाला गंगाजल अर्पण करून जलाभिषेक केला.सलग तीन वर्षांपासून महाप्रसादाचे मानकरी असलेल्या माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी यंदा देखील हजारो शिवभक्तांच्या प्रसादाची व्यवस्था केली. कावड यात्रेतील शिवभक्तांसह नायगांव तालुक्यातील तीन हजार पेक्षा अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.यावेळी श्रावण पाटील भिलवंडे यांनी सर्व भाविकांचे अगत्यपूर्ण आदरातिथ्य करून आभार मानले. संपूर्ण कावड यात्रेत शेकडो शिवभक्तांसह श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिर नरसी पर्यंत स्वतः प्रत्यक्ष सहभाग घेत माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी पायी मार्गक्रमण केल्याने भाविकांचा देखील उत्साह द्विगुणित झाल्याचे चित्र होते.

प्रचंड भक्तीभावाने व अपूर्व उत्साहात संपन्न झालेल्या या भक्तिमय कावड यात्रेत वे.शा.स.संदीप महाराज जोशी, रामकिसन महाराज राजलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे, राजेश भिलवंडे, साईनाथ आक्कमवाड, बालाजी चिंतावार, पत्रकार गोविंद नरसीकर, सुभाष पेरकेवार, कैलास तेलंग, श्रीनिवास आक्कमवाड, मारोतराव वडगावे, अनिल श्रीरामवार, राम खनपट्टे, विनोद भिलवंडे, मारोती बुक्के, नंदेश्वर कोरे, संदीप भिलवंडे, गणेश मेहता, अंकुश खनपटे, रमेश वासरे, संतोष जुक्कलकर, जयदीप सोनकांबळे, गोविंद मानेमोड, मारोती वडजे, चंदू कोकणे, सोमेश शेटकर आदीसह असंख्य भाविक सहभागी झाले होते.

नरसी येथील सर्व शिवभक्तांनी कावड यात्रेच्या यशस्वी आयोजनात परिश्रम घेतले. पुढील वर्षीही भव्य कावड यात्रा काढण्याचा संकल्प करतांना भव्य महाप्रसादासह नरसी येथे विविध धार्मिक व भक्तिमय उपक्रम आयोजित करण्याचा मनोदय महाप्रसादाचे मानकरी असलेले माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी व्यक्त केला.

# लेखी टाईम बॉण्ड दिल्यानंतर इरशाद पटेल यांनी घेतले उपोषण मागे



**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ८ ऑगस्ट -**

लेंडी धरणग्रस्तांच्या विशिष्ट मागण्या घेऊन चार ऑगस्ट पासून ॲड.इर्शाद पटेल यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर येथे आमरण उपोषण सुरू होते. अखेर पुनर्वसनातील कामे ३० ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करण्याचे लेखी हमी मिळाल्यानंतर त्यांनी उपोषझ मागे घेतले.

बारा गावातील नागरिक धरणग्रस्तांच्या तसेच नवतरुणांच्या खंबीर पाठिंब्याने आणि विविध पक्ष व सामाजिक संघटनांनी तसेच पत्रकार संघटनांच्या भक्कम पाठिंबामुळे सदरील उपोषण पत्रकारांमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचले. हा उपोषण जिव्हाळ्याचा प्रश्न घेऊन उपोषणास बसल्याने रात्री अपरात्री सुद्धा जिल्ह्यातून विविध भागातून समर्थन पत्रे देण्यात येत होती त्यामुळे मला बळ येत होतं असे उपोषणकर्त्यांनी सांगितले. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी उपजिल्हाधिकारी व पोलीस निरीक्षक देगलूर यांची उपोषणकर्त्यासोबत चर्चा झाली. मात्र प्रशासन देत असलेल्या पोकळ आश्वासनावर विश्वास नसल्याचे सांगितल्याने चर्चा विफल ठरली. परत तिसऱ्या दिवशीही उपजिल्हाधिकारी यांनी उपोषणकर्त्यास भेट दिली. मात्र इर्शाद पटेल हे आपल्या मतावर ठाम राहिले.अखेर उपोषणाच्या चौथ्या दिवशी उपोषणकर्त्याची तब्येत खालावल्यानंतर प्रशासन नमते झाले. आणि पुनर्वसनातील कामे ३० ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करण्याचे लेखी हमी दिले. यामध्ये दिलेल्या वेळेत काम पूर्ण झाले नाही तर संबंधितावर कार्यवाही होईल असे पत्रात नमूद केले आहे. तसेच काही प्रश्न वरिष्ठ शासन तसेच मंत्रालय स्तरावरच्या असल्याने येत्या आठवड्यात जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे विशेष बैठकीचे नियोजन केले आहे.

प्रमूख मागण्यातून वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्यांना वाढीव कुटुंब मावेजा कशा पद्धतीने देता येईल, तसेच ज्याची वारस ही मुलगी आहे त्यास मोबदला देणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र परत घेऊन एकमुस्त रक्कम का देण्यात येऊ नये? व वाहतूक भत्ता ५० हजारापेक्षा अधिक कसा देता येतो हे इर्शाद पटेल यांनी महाराष्ट्र शासन निर्णयाचा पुरावा देत समजावले. जे की योग्य असल्याचे उप जिल्हाअधिकारी यांनी मान्य केले. व लगेचच यावर बैठक घेऊन तात्काळ निर्णय घेण्याचे ठरवले. याशिवाय ज्यांनी आजपर्यंत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र काढले नाही अशांसाठी १५ ऑगस्ट नंतर लगेचच उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर येथे कॅम्प लावण्याचे ठरले.

# ॲड. प्रतिक केराम यांच्या वाढदिवसानिमित्त किनवटमध्ये विविध सामाजिक उपक्रमांचा उत्साह



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ८ ऑगस्ट -**

आ. भिमराव केराम यांचे सुपुत्र व जंगो रायताड प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रतिक केराम यांच्या वाढदिवसानिमित्त किनवट शहरात भारतीय जनता पार्टी किनवट आणि ॲड. प्रतिक केराम मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात धार्मिक वातावरणात झाली. शहरातील साईबाबा मंदिरात ॲड. प्रतिक केराम यांच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी दुग्धाभिषेक व महाआरती आयोजित करण्यात आली. या वेळी मंदिर परिसर भक्तीभावाने गजरलेल्या मंत्रोच्चारांनी दुमदुमून गेला. यानंतर शिक्षण क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने कॉस्मॉपॉलिटन विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. वह्या, पेन, पेन्सिल, ड्रॉईंग साहित्य आदी शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

सामाजिक कार्याचा पुढचा टप्पा आरोग्य क्षेत्राकडे वळला. उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांना मानसिक बळ देण्यात आले. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. याशिवाय शहर व परिसरात इतरही लहानमोठे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या सर्व कार्यक्रमात भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रमंडळाचे सदस्य, नागरिक तसेच लाभार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. या उपक्रमांमधून ड. प्रतिक केराम यांची वाढदिवस साजरा करण्याची वेगळी आणि समाजाभिमुख परंपरा अधोरेखित झाली. राजकारण, समाजकार्य आणि सेवाभाव यांची सांगड घालून तरुणाईसाठी त्यांनी प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती ज्यामध्ये क्रांतीशरण केराम, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, उमाकांत कऱ्हाळे, माजी शहराध्यक्ष सतीश बिराजदार, रवि चव्हाण, माजी नगरसेवक शिवा आंधळे, बालाजी बामने, मनोज जाधव, श्याम मगर, सामाजिक कार्यकर्ते शंकर मानकर, संतोष मारस्कोल्हे, सुनील मच्छेवार, पप्पू करनेवार, मनोहर श्रीरामे, अमोल जाधव, सुशील बड्डीवार, प्रवीण श्रीमनवार, आशुतोष बेद्रे, निकेतन सुरोशे, दीपक सातव, महेश कट्टजीवार, सुमित नरोटे, अमन कुंडगीर, राजेश भातनासे, विश्वास कोल्हारीकर, जयराज वर्मा, बाळकृष्ण कदम, अभिजीत बोनगीरवार, नर्सिंग तक्कलवार, , आकाश भंडारे, राहुल दरगुलवार, शंकर भंडारे, बालाजी धोत्रे, शिवा क्यतमवार, नागभूषण येम्बरवार, कृष्णा कलकुटलवार, राम शेपूरवार, गंगूबाई परेकर व विद्या ताई पाटील यांचा समावेश होता.

# मनोकामना पुर्ण झाल्याने चक्रीच्या जागृत हनुमंतराया चरणी मुस्लिम कुटुंबियांतर्फे नगरभोजन

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि. ८ ऑगस्ट -**

हदगाव तालुक्यातील मौजे चक्री येथिल महाराष्ट्रभर ख्याती असलेल्या नवसाला पावणाऱ्या हनुमंतराया चरणी निवघा बाजार येथिल मुस्लिम कुटुंबीयांकडून बोललेली मनातील मनोकामना पुर्ण झाल्याने नगरभोजन देऊन नवस पुर्ण करण्यात आला.

तालुक्यातील निवघा बाजारपेठेपासून जवळच असलेल्या मौजे चक्री येथिल हनुमंतरायाची नवसाला पावणारा मारुती म्हणुन महाराष्ट्रभर ओळख आहे निवघा बाजार येथील विद्यमान सरपंच शकीलाबी शेख इस्माईल कुरेशी व त्यांच्या कुटुंबीयांनी येथील हनुमंतराया चरणी काही महिन्यापूर्वी आपल्या मनातील मनोकामना पूर्ण व्हावी याकरिता कौटुंबिक नवस बोलला होता



अवघ्या काही महिन्यातच त्यांनी बोललेला नवस पूर्ण झाल्याने त्यांनी सध्या सुरू असलेल्या पवित्र श्रावण मासाचे औचित्य साधून दि. ७ ऑगस्ट रोजी चक्री येथील हनुमंत रायाच्या मंदिर प्रांगणात हिंदू मुस्लिम एकतेची भावना मनात ठेवत अनोख्या नगर भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला तर चक्री येथील हिंदू ग्रामस्थांनी त्याला प्रतिसाद देत संस्थांच्या वतीने त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पहार घालून यथोचित सत्कार केला. या नगरभोजनाच्या कार्यक्रमाला चक्रीग्रामस्थ व निवघा बाजारपेठेतील व्यापाऱ्यांसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती

**हिंदू - मुस्लिम ऐकतेचे अनोखे नगर भोजन**

चक्री येथील नवसाला पावणाऱ्या हनुमंतराया चरणी मागील दोन वर्षापासून अंदाजे ७० च्या वर भाविकांनी आपल्या मनातील मनोकामना पूर्ण झाल्याने नगर भोजनाचे कार्यक्रम आयोजित केले होते परंतु एका मुस्लिम कुटुंबीयांकडून आपला नवस पूर्ण झाल्याचे सांगत हिंदू धर्मीयांच्या पवित्र श्रावण मासात हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक दाखवत हिंदू धर्मीयांचे आराध्य दैवत असलेल्या हनुमंतराया चरणी मुस्लिम कुटुंबीयांनी दिलेले नगर भोजन हिंदू मुस्लिम एकीचे अनोखे नगर भोजन ठरल्याची चर्चा परिसरात सुरु आहे

**PROCLAIMATION**

My Old Name: JADHAV VENKAT VITHALRAO Which Now I am Changing as, New Name: VENKATRAO VITHALRAO JADHAV Hence, forth my all Correspondence will be done as per My New Name Please Consider both Name person is same.

**Address:**
Sadanand Medical, Balaji Mandir Galli, Umri (Stn.) Tq. Umri, Dist. Nanded. Mobile: 9404752108

# श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता २८६ कोटींवरून होणार ३५१ कोटींचा!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ ऑगस्ट**

पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री वैद्यनाथ प्रभूंच्या मंदिर व परिसराच्या विकास कामांचा आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे आढावा घेण्यात आला. यावेळी विकास आराखड्याच्या माध्यमातून सध्या सुरू असलेल्या व नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या विकास कामांचे सादरीकरण करण्यात आले.



मंदिर व परिसराचा विकास करताना पौराणिक महत्त्व अबाधित राखून अभूतपूर्व विकास कार्य करण्यात यावे, अशा सूचना अजित दादांनी सर्व संबंधितांना दिल्या. वाहनतळ, मेरुगिरी पर्वत परिसरातील कामे, दर्शन मंडप, नंदी, शिव प्रतिमा, उद्यान, प्रवेशव्दारे यांसह लागणाऱ्या अधिकच्या जमीन अधिग्रहण करण्याची जबाबदारी यावेळी धनंजय मुंडे यांनी घेतली आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करत आराखडा कामातील बारकावे सर्वांच्या लक्षात आणून दिले.

वाढीव जागेसह विविध कामांच्या पूर्ततेसाठी वाढीव निधीची तरतूद करण्याबाबत विनंती करताच अजित दादांनी ती मान्य केली असून, आता आराखडा २६८.६८ कोटिंवरून ३५१ कोटी इतका वाढवण्यास मान्यता दिली असून, या कामाला गती व निधी मंजूर करता यावा यासाठी हे काम नियोजन विभागाकडे वर्ग करण्यासही अजित दादा पवार यांनी मान्यता दिली आहे.

यावेळी धनंजय मुंडे यांनी अजित दादा पवार यांचे सर्व परळीकर व शिव भक्तांच्या वतीने आभार मानले, बैठकीस आ. विक्रम काळे, आ. नमिता मुंदडा, सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पालक सचिव श्री. वाघमारे, आर्किटेक्ट हेमंत पाटील, परळी नगर पालिकेचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, श्री. बेंडले, श्री. ढवळे यांसह आदी उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यामध्ये ४९ पोलीस नाईक आणि २० पोलीस हवालदारांना पदोन्नती



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ ऑगस्ट**

पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील ४९ पोलीस नाईकांना पोलीस हवालदार पदावर आणि २० पोलीस हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती दिली आहे.

पदोन्नतीचा तपशील:

पोलीस नाईक (PN) ते पोलीस हवालदार (HC) पदी पदोन्नती मिळालेल्या ४९ अंमलदारांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे: मपोना/१८३८ आशा आप्पाराव चांदणे, मपोना/१८४० सविता पांडुरंग राऊत आणि मपोना/२८५ गिरिजा बाब्रुवण सर्यवंशी.

पोलीस हवालदार (HC) ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) पदी २० अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली आहे.पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस अंमलदारांचे पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांनी अभिनंदन केले आहे.

# धारूर तालुक्यात ‘हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र’ अभियानाचा जयघोष!
## तीन लाख वृक्षारोपणाचे उद्दिष्ट पूर्ण करून निसर्गाला दिले नवसंजीवनी

तहसीलदार निळे साहेब, मुख्याधिकारी गायकवाड, गटविकास अधिकारी लोखंडे पोलीस निरीक्षक वाघमोडे,यांच्यासह सर्व शासकीय–निमशासकीय कार्यालयांचा सहभाग; धारूर शहर आणि तालुका हिरवेगार करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल.



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.८ ऑगस्ट**

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान २०२५ अंतर्गत धारूर तालुक्याने एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या अभियानांतर्गत धारूर तालुका आणि शहरासाठी एकूण तीन लाख वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते, जे दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. तहसील कार्यालय, नगरपरिषद किल्ले धारूर, पंचायत समिती, कृषी विभाग, एस.टी. महामंडळ, वन विभाग, सामाजिक वनीकरण, आरोग्य विभाग, पोलीस ठाणे, तसेच सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांच्या एकत्रित प्रयत्नांतून हे भव्य उद्दिष्ट साध्य झाले.

या विशेष वृक्षारोपण मोहिमेत धारूर तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी मोलाचा सहभाग घेतला. यामध्ये तहसील कार्यालय, नगरपरिषद किल्ले धारूर, पंचायत समिती, कृषी कार्यालय, एस.टी. डेपो, वन विभाग, सामाजिक वनीकरण कार्यालय, आरोग्य विभाग (ग्रामीण आणि शहरी दोन्ही), जिल्हा परिषद शाळा, विविध ग्रामपंचायती आणि तालुक्यातील सर्व महाविद्यालये यांचा समावेश होता.

या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी तहसीलदार श्री. निळे साहेब, मुख्याधिकारी श्री. महेश गायकवाड, पंचायत समितीचे श्री. लोखंडे साहेब यांच्यासह सर्व कार्यालयांचे प्रमुख आणि कर्मचारी, शाळकरी विद्यार्थी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, उपसरपंच,जय गणेश मंडळ,सामाजिक संस्था,सामाजिक संघटना,आणि तालुक्यातील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे तीन लाख वृक्षांचे उद्दिष्ट वेळेपूर्वीच पूर्ण झाले.

या वृक्षारोपणामुळे भविष्यात धारूर तालुक्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन आणि फळे उपलब्ध होणार असून, पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे. ‘हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र’ या अभियानाचे उद्दिष्ट केवळ वृक्षारोपण नसून, लावलेल्या रोपांचे योग्य संगोपन करणे हेदेखील आहे, असा निर्धार यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. या यशस्वी उपक्रमामुळे धारूर तालुका आणि शहराची ओळख भविष्यात एक हिरवीगार आणि समृद्ध भूमी म्हणून होईल यात शंका नाही.

# आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास होतो–डॉ.स्वाती शिंदे

**रोटरी क्लबच्या वतीने स्तनपान सप्ताह साजरा**
**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ ऑगस्ट**

आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास तर होतोच. पण त्याचबरोबर त्याची प्रतिकारशक्ती देखील वाढते. आणि म्हणूनच या मातेच्या दुधाला पहिली लस असे देखील संबोधले जाते. असे प्रतिपादन येथील प्रसिद्ध आहार तज्ज्ञ डॉ.स्वाती अतुल शिंदे यांनी केले.



लोखंडी सावरगाव येथील स्त्रीरुग्णालयात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीनेस्तनपान जनजागृती व स्तनदा माता बालकांचे आरोग्य या एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.स्वाती शिंदे बोलत होत्या. यावेळी मंचावर स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. चंद्रकांत चव्हाण,

डॉ.चंद्रकांत चव्हाण, मार्गदर्शक स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. चेतन आदमाने,रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी,सचिव मंजुषा जोशी , स्वरूपा कुलकर्णी, डॉ.अलका तडकलकर , गीता कुलकर्णी , योग शिक्षिका मंदाकिनी गीते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना स्वाती शिंदे म्हणाल्या की बाळ जन्माला आल्यानंतर त्याला काही वेळानंतर पहिल्यांदा आईचेच दुधपाजले पाहिजे. कारण तेच त्याच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असते. परंतु, आजकालच्या महिला त्या विसरत चालल्या आहेत की काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

या प्रसंगी बोलताना डॉ. चंद्रकांत चव्हाण म्हणाले की, नवजात बाळांचे आरोग्य आणि मातांचे पोषण यांचा गाभा असलेले स्तनपान हे केवळ एक नैसर्गिक प्रक्रिया नसून, नव्या पिढीचे आरोग्यदायी भविष्य घडवणारे शक्तिशाली माध्यम आहे.स्तनपानाबाबत अजूनही समाजात काही गैरसमज, माहितीअभावी चुका आणि अज्ञान आहेत. हे दूर करताना डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि सामाजिक संस्थांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते. म्हणूनच, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि स्त्री रुग्णालय लोखंडी सावरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने. हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रा.रोहिणी पाठक यांनी महिलांना प्रश्नोतरातून आईच्या दुधाची बँक या उपक्रमा बाबत जनजागृती केली.यावेळी डॉ.चेतन आदमाने यांनीही स्तनदा मातांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख स्वरुपा कुलकर्णी यांनी केले. संचलन सीमा पार्डीकर. यांनी तर उपस्थितांचे आभार सचिव मंजुषा जोशी यांनी मानले. या कार्यक्रमास रुग्णालयातील परिचारिका व कर्मचारी उपस्थित होते.

# माजलगावात मुख्यरस्त्यावर साचते गुडघाभर पाणी!

मोहन जगताप यांनी रस्त्यावर उतरत नगरपरिषद कर्मचाऱ्यांची केली कानऊघडणी. लोकप्रतिनिधींच्या निष्काळजी कारभारावर व्यापाऱ्यांचा संताप.



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ ऑगस्ट**


माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यावर पडणाऱ्या पावसामुळे नरवडे कॉम्प्लेक्ससमोर गेल्या अनेक दिवसांपासून साचलेल्या गुडघाभर पाण्यामुळे व्यापाऱ्यांचे हाल सुरू असून आहेत. यामुळे नागरिक,वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान मोहन जगताप यांनी गुरुवारी दुपारी रस्त्यावर उतरत या प्रश्नासंदर्भात नगरपरिषद कर्मचाऱ्यांची कान उघडनी केली.

दरम्यान यावेळी नागरिकांनी लोकप्रतिनिधीच्या निष्काळजीपणा विषयी संताप व्यक्त केला. पडणाऱ्या पावसामुळे शहरातील बीड रोड नरोडे कॉम्प्लेक्स समोरील परिसर पाण्याने तुडुंब भरल्या जात आहे.रस्त्याच्या दोन्ही बाजूला गुडघाभर पाणी जमा होते.नगर परिषद गेल्या पाच ते सहा वर्षां पासून प्रशासकाच्या ताब्यात आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधीचे नियंत्रण नाही.नाल्यांची सफाई नसल्याने पावसाचे पाणी नालीत अनं नाल्याचे पाणी रस्त्यावर साचते.आणि शहरातील मुख्य भागात असह्य परिस्थिती निर्माण होते.नगरपरिषद लोकप्रतिनिधींनी आता तरी जागं व्हावं,साचलेल्या पाण्याचा तत्काळ निचरा करून व्यापार आणि नागरिकांचे हाल थांबावेत,यासाठी छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहन जगताप रस्त्यावर उतरले.यावेळी त्यांनी रस्त्याची नाल्याची पाहणी केली. व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या. संबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना बोलावून घेतले. तात्काळ हा प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली. यावेळी त्यांच्यासोबत नगरसेवक शरद यादव शंकर शेंडगे आबा नाईकनवरे सर्जेराव शिंदे शेख रशीद बालाप्रसाद नाटकर गोविंद ईतापे कल्याण जाधव सह नागरिक उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे हक्काचे पीक विम्याचे पैसे खात्यात वर्ग करण्यास अकार्यक्षम शासनाकडून वेळ का लागतो वसंत मुंडे यांचा सवाल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ ऑगस्ट**

शेतकऱ्याचे पीक विम्याचे पैसे केंद्र व राज्य सरकारने कंपन्यांना वर्ग केलेले असून ही केंद्रातील व राज्यातील कृषिमंत्र्याच्या हस्ते शेतकऱ्याच्या बँकेच्या खात्यात वर्ग करण्याचे अखेर मुहूर्त सापडत नाही म्हणून



शेतकऱ्याला जास्तीत जास्त अकार्यक्षम सरकारकडून आर्थिक त्रास दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यानी केला.

शेतकऱ्यापुढे अगोदरच शेतीमालाचे हमीभावाने बाजारपेठेत खरेदी विक्री केली जात नाही तसेच निसर्गाचा पाऊस वेळेवर पडत नाही खते बी बियाणे कीटकनाशके औषधं बोगस निकृष्ट विविध कंपन्यातून शेतकऱ्याला पुरवले जात आहेत. कंपनीवर कारवाई केली जात नाही. वेगवेगळे नियम दाखवून ठिबक व इतर अनुदानामध्ये शेतकऱ्याचे आर्थिक त्रास दिला जात आहे. दुबार पेरणी अनेक ठिकाणी शेतकऱ्याला करावी लागत आहे. तरीही शासनाकडून दखल नियमानुसार घेतली जात नाही. शेतकऱ्याला आर्थिक दृष्ट्या केंद्र व राज्य सरकारने कमकुवत करून खूप मोठे नुकसान केले आहे. एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही कृषि मंत्र्यांना पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यास वेळ लावण्याचे कारण काय? केंद्र व राज्यातील दोन्हीही कृषीमंत्र्यांनी पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ वर्ग करण्याचे आदेश पारित करण्यात यावेत अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केली.

# तुलसी योगा सेंटर ची बीडमध्ये प्रभावी सुरुवात
## शहरवासीयांसाठी शास्त्रशुद्ध योग, ध्यान आणि मेडिटेशन प्रशिक्षणाची सुवर्णसंधी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ ऑगस्ट**

तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे ‘तुलसी योगा सेंटर’ या नव्या उपक्रमाची नुकतीच सुरुवात करण्यात आली असून, बीड शहरात प्रथमच शास्त्रोक्त पद्धतीने योगासने, प्राणायाम, ध्यान आणि मेडिटेशनचे प्रशिक्षण देणारे हे केंद्र सर्व नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे.

या केंद्राचे मार्गदर्शन योगशिक्षक डॉ.सुनील जोंधळे हे करत असून, त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वाखाली नियमित योगसत्रे सुरू झाली आहेत. या प्रशिक्षणाला विद्यार्थ्यांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील साधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.या उपक्रमात योगासने, शारीरिक लवचीकता वाढवणारे व्यायाम, मानसिक एकाग्रता वाढवणारे ध्यान, तसेच आरोग्यदायी जीवनशैली घडवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन अशा विविध घटकांचा समावेश आहे. महिलांसाठी स्वतंत्र सत्रांचीही व्यवस्था करण्यात आली असून, त्यांच्या सोयीसाठी विशिष्ट वेळा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. योग प्रशिक्षणासाठी सकाळी व संध्याकाळी अशा दोन सत्रांत वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या वेळेनुसार कोणत्याही सत्रात सहभागी होण्याची मुभा आहे.मानसिक आरोग्य, तणावमुक्त जीवनशैली आणि शारीरिक सुदृढतेसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार असून, ‘तुलसी’ संस्थेने या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्यसंपन्न जीवनशैलीचा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. या योग केंद्राचा लाभ अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.